

नागपूरला प्रदूषणमुक्त शहर बनवायचेय (पान २ वर)

दैनिक
# दिव्य वतन
जनसामान्यांचा बुलंद आवाज

नागपूर, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, वर्धा, यवतमाळ, अकोला, वाशीम, बुलडाणा, नांदेड, हिंगोली, परभणी, लातूर, धाराशिव, अहिल्यानगर, छ. संभाजीनगर, बीड, जालना, नंदुरबार, धुळे, नाशिक



यश विषारी अन् आयुष्य नरक झाले होते (पान ६ वर)

RNI Number MAHBIL/२५/A०७८१ | E-mail : divyawatanngp@gmail.com | रविवार दिनांक १८ जानेवारी २०२६ | अंक : १६४ वा वर्ष : २ रे, मूल्य : ३ रुपये, पृष्ठे : ८

# महापौर निवडीआधीच शिंदेंची ‘हॉटेल डिप्लोमसी’! २९ नगरसेवक ताजमध्ये

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई : मुंबई महापालिका निवडणुकीत भाजप आणि Shiv Sena (शिंदे गट) यांना बहुमत मिळाले असले, तरी सत्ता स्थापनेसाठी परस्परावलंबन स्पष्ट झाले आहे. शिंदेंच्या मदतीशिवाय भाजपला एकहाती सत्ता स्थापन करता येणार नाही, तर ठाकरे गट सत्तेपासून दूरच आहे. मात्र या राजकीय समीकरणांच्या पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदेंनी मोठी रणनीती आखल्याची चर्चा सुरू झाली आहे.

शिंदे गटातून विजयी झालेले 29 नगरसेवक पुढील तीन दिवस हॉटेलमध्ये ठेवण्यात येणार आहेत. वांद्रे येथील Taj Lands End येथे या नगरसेवकांचा मुक्काम असणार असून, आज संध्याकाळी सर्वांना तिथे उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. महापौर निवड होईपर्यंत हॉटेलमध्येच थांबण्याचे आदेश देण्यात आले असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात येते.

ठाकरे गटाकडून ‘दगाफटका’ची भीती?

शिंदे गटातील काही नगरसेवकांनी पूर्वी Uddhav Thackeray यांच्यासोबत काम केले आहे. त्यामुळे ऐनवेळी ठाकरे गटाकडून नगरसेवक फोडून सत्ता स्थापनेचा दावा होऊ



शकतो, अशी भीती शिंदे गटात असल्याची चर्चा आहे. हीच शक्यता लक्षात घेऊन नगरसेवकांना एकत्र ठेवण्याची खबरदारी घेतली जात असल्याचे बोलले जात आहे.

भाजपपासूनही अंतर ठेवण्याची चाल?

एका मतप्रवाहानुसार, ही खेळी केवळ ठाकरे गटापासूनच नव्हे तर भाजपपासूनही आपल्या नगरसेवकांना लांब ठेवण्यासाठी आखली गेली आहे. महापौर भाजपचा होणार असला, तरी शिंदे गटाच्या नगरसेवकांशिवाय ते शक्य नाही. त्यामुळे भाजपसोबत कठोर बोलणी करून मुंबई महापालिकेत सत्तेतील मोठा वाटा मिळवण्यासाठी शिंदेंची ही रणनीती असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, शिंदे गटाने अधिक ताण दिल्यास भाजपकडूनही फोडाफोडीची शक्यता नाकारता येत नाही, अशीही चर्चा आहे.

महापौरपदावर शिंदे गटाचा दावा?

मुंबईचा महापौर शिवसेनेचाच (शिंदे गट) व्हावा, अशी जोरदार मागणी पक्षात होत आहे. कमी जागा असतानाही भाजपने एकनाथ शिंदेंना मुख्यमंत्रिपद दिले होते, मग मुंबईचे महापौरपद देण्यात अडचण काय? असा सवाल शिंदे गटात उपस्थित केला जात आहे. त्यामुळे आगामी दिवसांत महापौरपदावर थेट दावा शिंदे गटाकडून मांडला जाण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

राजकीय हालचालींनी वेग घेतलेल्या मुंबईत, महापौर निवडीपर्यंतची ही ‘हॉटेल डिप्लोमसी’ सत्तासमीकरणे कशी बदलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## महत्त्वाचे...

### लाडक्या बहिणींनी अडवला मुंबई-कोलकाता महामार्ग




भंडारा - मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या नोव्हेंबर आणि डिसेंबर महिन्यांचा हप्ता वर्ग करण्यात आल्याचा दावा सरकारकडून करण्यात आला असला, तरी प्रत्यक्षात राज्यातील अनेक लाभार्थी महिलांच्या खात्यात अजूनही हे पैसे जमा झालेले नाहीत. या पार्श्वभूमीवर महिलांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून, त्याचा थेट उद्रेक भंडारा जिल्ह्यात पाहायला मिळाला. शनिवारी सकाळी संतप्त लाडक्या बहिणींनी मुंबई-कोलकाता राष्ट्रीय महामार्ग अडवत आंदोलन केल्याने परिसरात एकच खळबळ उडाली.

भंडारा शहरातील नागपूर नाका परिसरात महिलांनी महामार्गावर ठिय्या आंदोलन सुरू केल्यामुळे दुतर्फा वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. काही वेळातच वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आणि प्रवाशांना प्रचंड गैरसोयीचा सामना करावा लागला. अचानक झालेल्या या चक्काजाम आंदोलनामुळे महामार्गावरून जाणाऱ्या अवजड वाहनांसह खासगी वाहनेही अडकून पडली होती. या दृश्यामुळे प्रशासनाची धावपळ उडाल्याचं पाहायला मिळालं. आंदोलन करणाऱ्या महिलांनी सरकारविरोधात तीव्र संताप व्यक्त केला. नोव्हेंबर आणि डिसेंबर या दोन महिन्यांचे पैसे खात्यात का जमा झाले नाहीत? असा थेट सवाल महिलांनी उपस्थित केला.

### महापालिका निकालांवर संजय राऊतांची तोफ



मुंबई :महानगरपालिका निवडणुकांच्या निकालानंतर राज्यातील राजकारण अधिक तापले असून उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी पत्रकार परिषदेत जोरदार टीका करत अनेक राजकीय मुद्द्यांवर स्पष्ट भूमिका मांडली. मुंबई महापालिकेतील सत्ता परिवर्तन, एकनाथ शिंदे यांची भूमिका, मनसेचा निकाल, तसेच काँग्रेसची रणनीती यावर भाष्य करत राऊतांनी आक्रमक शब्दांत विरोधकांवर निशाणा साधला. विशेषतः मुंबईत भाजपचा महापौर होण्यामागे एकनाथ शिंदे कारणीभूत असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला.संजय राऊत म्हणाले की, एकनाथ शिंदे शिवसेनेचे ‘जयचंद’ झाले नसते, तर मुंबई महापालिकेत भाजपचा महापौर कधीच झाला नसता. मराठी जनतेने शिंदेंना इतिहासात जयचंदच्या भूमिकेतच लक्षात ठेवावं लागेल, अशी टीका त्यांनी केली. शिंदेंमुळेच मराठी माणसाची सत्ता मुंबईतून गेली, असा आरोप करत राऊतांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली. महाराष्ट्रात या निर्णयामुळे प्रचंड संतापाची लाट असून, भविष्यात शिंदेंना मोकळेपणाने फिरणंही अवघड होईल, असा इशाराही त्यांनी दिला.मनसेच्या कामगिरीवर भाष्य करताना संजय राऊत यांनी थेट अपेक्षा व्यक्त केली. त्यांच्या मते, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला किमान 10 ते 12 जागा मिळणं आवश्यक होतं.

# महापालिकेनंतर आता जिल्हा परिषदेचे रणशिंग:राष्ट्रवादीची ४० स्टार प्रचारकांची यादी जाहीर, कोणकोणत्या दिग्गजांचा समावेश?

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई : राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निकालानंतर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज पत्रकार परिषद घेत सत्ताधारी महायुतीवर बोचरी टीका केली.

"सत्ताधाऱ्यांनी ही निवडणूक अत्यंत घाणेरड्या पद्धतीने, साम-दाम-दंड-भेदाचा वापर करून लढवली. मात्र, तरीही शिवशक्तीने जे यश मिळवले आहे, त्याने सत्ताधाऱ्यांना घाम फोडला आहे.

आमच्या पराजयाला तेज आहे, मात्र, त्यांचा विजय हा डागाळलेला आहे, अशा शब्दांत त्यांनी भाजपवर निशाणा साधला.उद्धव ठाकरे म्हणाले, नुकत्याच झालेल्या २९ महापालिकांचे निकाल काल जाहीर झाले. सर्वच महापालिकांच्या प्रचाराला मी जाऊ शकलो नाही. तीन महापालिकांच्या प्रचाराला गेलो होतो. चंद्रपुरातही शिवसेनेचे चांगले नगरसेवक



निवडून आलेत. परभणीमध्ये शिवसेनेने उत्तम यश प्राप्त केले.

जिथे मी जाऊ शकलो नाही, त्या सर्व शिवसैनिकांची आणि मतदारांची दिलगिरी व्यक्त करतो. ज्या ज्या मतदारांनी शिवसेना आणि शिवशक्ती युतीला मतदान केले आणि तिनही पक्षांच्या कार्यकर्त्यांना धन्यवाद देतो आणि अभिनंदही करतो.उद्धव ठाकरे म्हणाले, या निवडणुका सत्ताधारी पक्षाकडून विचित्र आणि अत्यंत घाणेरड्या पद्धतीने लढवल्या गेल्या. आपल्या जीवन मरणाचा प्रश्न असल्याच्य पद्धतीने साम, दाम, दंड, भेद याच्या पलिकडे जाऊन त्यांनी सर्वकाही वापर केला.

# छांगुरबाबा धर्मांतरण प्रकरणात नागपूर कनेक्शन उघड

दिव्य वतन /वृत्तसेवा


मुंबई : छांगुरबाबाच्या धर्मांतरण नेटवर्कचे नागपूर कनेक्शन समोर आले आहे. राजस्थान, लखनऊ, बलरामपूर आणि पुण्यानंतर आता नागपूरमध्येही या प्रकरणाची पाळेमुळे आढळली आहेत. आशी नगर येथील गवसीया मशीदजवळ राहणाऱ्या इरदुल इस्लाम वल्द गुलाम येजदानी याला उत्तर प्रदेश एटीएसने नागपूर एटीएस आणि स्थानिक पोलिसांच्या मदतीने अटक केली आहे. शनिवारी पहाटे ५.३० वाजता त्याच्या घरातून त्याला ताब्यात घेण्यात आले.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, इरदुल इस्लाम हा छांगुरबाबा प्रकरणात फरार होता. त्याच्याविरोधात उत्तर प्रदेश एटीएसने अटक वॉरंट जारी केले होते.

# सत्ताधाऱ्यांनी घाणेरड्या पद्धतीने निवडणुका लढवल्या

## आमच्या पराजयाला तेज, त्यांचा विजय डागाळलेला; उद्धव ठाकरेंचा घणाघात

दिव्य वतन /वृत्तसेवा




मुंबई : राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निकालानंतर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज पत्रकार परिषद घेत सत्ताधारी महायुतीवर बोचरी टीका केली. "सत्ताधाऱ्यांनी ही निवडणूक अत्यंत घाणेरड्या पद्धतीने, साम-दाम-दंड-भेदाचा वापर करून लढवली. मात्र, तरीही शिवशक्तीने जे यश मिळवले आहे, त्याने सत्ताधाऱ्यांना घाम फोडला आहे. आमच्या पराजयाला तेज आहे, मात्र, त्यांचा विजय हा डागाळलेला आहे, अशा शब्दांत त्यांनी भाजपवर निशाणा साधला. उद्धव ठाकरे म्हणाले, नुकत्याच झालेल्या २९ महापालिकांचे निकाल काल जाहीर झाले. सर्वच महापालिकांच्या प्रचाराला मी जाऊ शकलो नाही. तीन महापालिकांच्या प्रचाराला गेलो होतो. चंद्रपुरातही शिवसेनेचे चांगले नगरसेवक निवडून आलेत. परभणीमध्ये शिवसेनेने उत्तम यश प्राप्त केले. जिथे मी जाऊ शकलो नाही, त्या सर्व शिवसैनिकांची आणि मतदारांची दिलगिरी व्यक्त करतो. ज्या ज्या मतदारांनी शिवसेना आणि शिवशक्ती युतीला मतदान केले आणि तिनही पक्षांच्या कार्यकर्त्यांना धन्यवाद देतो आणि अभिनंदही करतो.उद्धव ठाकरे म्हणाले, या निवडणुका सत्ताधारी पक्षाकडून विचित्र आणि अत्यंत घाणेरड्या पद्धतीने लढवल्या गेल्या. आपल्या जीवन मरणाचा प्रश्न असल्याच्य पद्धतीने साम, दाम, दंड, भेद याच्या पलिकडे जाऊन त्यांनी सर्वकाही वापर केला.

धाक दाखवणे, पैशांची लालूच, काही शिवसैनिकांना तडीपारीच्या नोटीसी, काहींना अटक केली. दंगली भडकवण्याचे प्रयत्न झाले. ठाण्यातील उमेदवारांना पैशांचे आमिष दाखवण्यात आले. काहींना बळजबरीने उमेदवारी मागे घ्यायला लावल्या. या सर्व गुंडागर्दीला न घाबरता, ज्या ज्या उमेदवारांनी ही लढत दिली आणि ज्यांनी निर्भयपणाने मतदान केले, हे सगळे लोकशाहीचे रक्षक आहेत.

मुंबईत आमचा महापौर व्हावा, अशी इच्छा होती. तो आकडा आजतरी गाठू शकलो नाही. पण त्यांच्या खेळाला उत्तर देऊन शिवशक्तीने जे यश मिळवले, त्या निकालाने सत्ताधारी पक्षाला घाम फोडलाय. सत्ताधाऱ्यांनी एकही प्रयत्न असा सोडला नाही, जिथे शिवसेना उरणार नाही. एका गणिताचे उत्तर मला मिळाले नाही. आमच्या सभेला शिवाजीपार्क फुलून गेले होते. त्याच्या दुसऱ्या दिवशी महायुतीच्या सभेला गर्दी नव्हती. मग त्यांना खुर्च्यांनी मतदान केले का? रिकाम्या खुर्च्या मतदान कशा करू शकतात? असा टोला उद्धव ठाकरे यांनी एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीसांना लगावला.

# नासके लोक सोबत ठेवल्याने पुण्यात मराठ्यांनी नाकारले

## मनोज जरांगेंनी सांगितले अजित पवारांच्या पराभवाचे कारण

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई : राज्यातील महापालिका निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर राजकीय वर्तुळातून विविध प्रतिक्रिया उमटत आहेत. मराठी आंदोलक मनोज जरांगे यांनीही महापालिका निवडणुकांच्या निकालावर भाष्य केले आहे.

मुंबईसह महाराष्ट्रात भाजपला मिळालेल्या यशावर बोलताना मनोज जरांगे पाटील यांनी अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा पराभव का झाला? त्यांना मराठा समाजाने का नाकारले? याचे कारणही सांगितले आहे. अजित दादांनी रक्ताने माखलेले आणि नासके लोक सोबत ठेवल्यामुळे मराठा समाजाने त्यांना पुण्यात धडा शिकवला, असे मनोज जरांगे म्हणाले.

मनोज जरांगे यांनी आज बीड



जिल्ह्यातील परळीतील मिरवट येथे एका धार्मिक कार्यक्रमाला हजेरी लावली होती. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

यावेळी त्यांनी महापालिका निवडणुकांच्या निकालांवर स्पष्ट शब्दांत भाष्य करत अजित पवार आणि भाजपवर निशाणा साधला.

पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये अजित पवारांच्या राष्ट्रवादीला मोठा फटका बसला आहे.

यावर बोलताना जरांगे पाटील म्हणाले, अजित पवारांनी नासके लोक आपल्यासोबत ठेवल्यामुळे त्यांना मराठ्यांचे मतदान पडलं नाही.

अजित दादा पण असे लोक सांभाळतो, त्यामुळे लोक लांब चालले आहेत, त्यांना आता कळाले. पापी लोक, रक्ताने माखलेले लोक सोबत ठेवले, तर असे परिणाम भोगावे लागतील. अजित दादांनी याच्यातून तरी समज घेतली पाहिजे. आपण असे नासके लोक सोबत ठेवले म्हणून आपल्यावर इतकी वाईट वेळ आली की मराठ्यांचे मतदान सुद्धा पडले नाही. नाहीतर पुण्यात अजित दादाला इतके कमी यश भेटलं नसतं. भाजप त्या लोकांना का जवळ करत नाही, यातून अजित पवारांनी काहीतरी शिकावं. दोन नासके सांभाळल्यामुळे मराठा समाज दूर गेला. त्यामुळे महानगरपालिकेला केवळ मराठ्यामुळेच पडावे लागले,

# वरच्या देवानेच मुंबईत महायुतीचा महापौर करायचा ठरवलंय

## एकनाथ शिंदे आणि आम्ही मिळून नाव ठरवू - देवेंद्र फडणवीस

दिव्य वतन /वृत्तसेवा

देवाच्या मनात असेल, मुंबई आपला महापौर होईल, असे विधान उद्धव ठाकरे यांनी केले होते. यावरून मुख्यमंत्री फडणवीस यांना उद्धव ठाकरेंना टोला लगावला आहे. वरच्या देवाने ठरवले की, महायुतीचा महापौर करायचा आहे. त्यामुळे आमचाच महापौर होईल, असे ते म्हणाले. तसेच महापौर कुणाला करायचे शिंदे आणि आम्ही मिळून ठरवू, असेही त्यांनी स्पष्ट केले.

देशातील सर्वात श्रीमंत आणि राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या बृहन्मुंबई महानगरपालिकेवर अखेर 25 वर्षांनंतर ठाकरे कुटुंबाची एकहाती सत्ता संपुष्टात आली आहे. या बहुचर्चित निवडणुकीत भाजपच्या नेतृत्वाखालील महायुतीने एकूण 118 जागांसह बहुमताचा 114 चा आकडा पार करत मुंबई महापालिकेवर वर्चस्व मिळवले आहे. त्यामुळे आता मुंबईचा महापौर महायुतीचाच होणार, हे जवळपास निश्चित मानले जात आहे. मुंबईचा महापौर कुणाला करायचे याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपरोक्त विधान केले. ते आज पुण्यात माध्यमांशी संवाद साधत होते.

देवाच्या मनात असेल, मुंबई आपला महापौर होईल, असे विधान उद्धव ठाकरे यांनी केले होते. याबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांना विचारले असता ते म्हणाले, देवाच्या म्हणजे माझ्या की, वरच्या देवाच्या? असा मिश्किल प्रश्न केला. ते पुढे म्हणाले, वरच्या देवाने ठरवले की, महायुतीचा महापौर करायचा आहे. त्यामुळे आमचाच महापौर होईल.

मुंबईचा महापौर कोण होणार? कधी होणार? किती वर्षे वाटून घ्यायचे? या सगळ्या गोष्टी शिंदे आणि मी, आणि आमचे दोन्हीकडील नेते मंडळी सगळे बसवून ठरवू. त्यात काही वाद येणार नाही. आम्ही दोन्ही पक्ष छान पद्धतीने मुंबई चालवून दाखवू, असेही देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.मुंबईत भाजप युतीला ११९ जागा मिळालेल्या आहेत. जवळपास आमच्या १४ जागा अतिशय कमी मतांनी हारलो आहोत. एवढ्या जागा एकत्रित शिवसेनेला देखील कधी मिळाल्या नव्हत्या. त्यांच्या तीनही निवडणुकीचा रेकॉर्ड आम्ही तोडलेला आहे. पूर्ण बहुमतामध्ये आम्ही निवडून आलो आहोत. त्यामुळे कोण काय म्हणतं? गिरा तो क्या हुआ, टांग तो उपर थी, असे म्हणणारे खूप लोक असतात. त्यावर फार काही बोलायचे नसते, असा टोला देवेंद्र फडणवीस यांनी संजय राऊत यांना लगावला.

शिवसेना शिंदे गटाच्या निवडणुकीतील कामगिरीवरही देवेंद्र फडणवीस यांनी भाष्य केले. आमच्यासारखेच एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेच्या काही जागा कमी मतांनी गेल्या



आहेत. मुंबईत पहिल्यांदाज तेही अशा पद्धतीने निवडणूक लढत होते. त्यामानाने त्यांना चांगले यश आले. अपेक्षा यापेक्षा जास्त होती, पण काही जागा या थोड्या मतांनी गेलेल्या दिसतायत, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

ठाकरे बंधुंच्या युतीमध्ये बिगेस्ट लूझर मनसे राहील, असे मला राजकीयदृष्ट्या दिसत होते. माझे भाकीत या निवडणुकीने स्पष्ट केले आहे. मनसेला किंवा राज ठाकरेंना या युतीचा कुठलाही फायदा झालेला नाही. उद्धवजींना झालेला दिसतोय, असा टोला देवेंद्र फडणवीस यांनी राज ठाकरेंना लगावला.

१ २ ३ ४ ५ ६

## महत्त्वाचे...

### अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचा 18 जानेवारीला समर्पण दिन कार्यक्रम आज

नागपुर : अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या नागपूर जिल्हा आणि महानगराच्या वतीने रविवारी १८ जानेवारीला, आदर्श संन्यासी योध्दा स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त समर्पण दिन सोहळा सायंकाळी साडेपाच वाजता आयोजित करण्यात आला आहे.ग्राहक पंचायतीच्या रामदासपेठ येथील मुख्य कार्यालयात होणाऱ्या या कार्यक्रमात विवेकानंद केंद्राचे संचालक डॉ.विलास देशपांडे हे प्रमुख वक्ता राहणार आहे, अध्यक्षस्थानी जिल्हा आणि महानगरचे कार्यकारी अध्यक्ष संजय धर्माधिकारी राहतील तर राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य गजानन पांडे यावेळी प्रामुख्याने उपस्थित राहतील. या कार्यक्रमास सर्व ग्राहक नागरिक बंधूभगीनी आवर्जुन उपस्थित रहावे असे आवाहन. जिल्हा अध्यक्ष गणेश शिरोळे महानगर अध्यक्ष अनिरुध्द गुप्ते, एडवोकेट स्मिता देशपांडे. अशोक पात्रीकर जिल्हा सचिव प्रकाश भुजाडे महानगर सचिव राजीव पुसदेकर, महानगर महिला प्रमुख सौ.तृप्ती आकांत, कोषाध्यक्ष श्रीपाद हरदास, उदय दिवे, ॲड. अनिरुध्द दंडे, समीर जोशी, सुधीर जोशी, विवेक दीक्षित, जिल्हा उपाध्यक्ष अरविंद हाडे जिल्हा उपाध्यक्ष बब्बू भाई शेख, संध्या पुनियानी, संध्या कुर्वे, प्राध्यापक प्रीती बैतुले, प्रमोद भागडे, सुधांशु दाणी डॉ. गुंडलवार, श्रीकांत चिखलीकर आदी अनेकांनी केले आहे.असे नगर संघटक संजय धर्माधिकारी यांनी सांगितले.

### आदिवासी वधू -वर परिचय मेळावा व आदिवासी एकता महोत्सवाचे आयोजन 1

नागपूर: राणी दुर्गावती आदिवासी बहुउद्देशीय संस्था महाराष्ट्र राज्याच्या वतीने राज्यस्तरीय आदिवासी वधू-वर परिचय मेळावा तथा आदिवासी एकतेचे एकता महोत्सवाचे आयोजन सोमवारी 19 जानेवारी ला कविवर्य सुरेशभट सभागृह रेशीमबाग नागपूर येथे सकाळी ११ ते सायंकाळी ६ या दरम्यान, राज्यस्तरीय समस्त आदिवासी वधू-वर परिचय मेळावा व एकता महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे. यावेळी या कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्याचे आदिवासी विकासमंत्री मा. अशोकजी उईके यांची प्रामुख्याने उपस्थिती राहील. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष चिमूर गडचिरोली येथील खासदार मा.डॉ. नामदेवजी किरसान यांची उपस्थिती राहणार आहे. तरी या कार्यक्रमाला सर्व आदिवासी समाज बांधवांनी आपल्या कुटुंबासह उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थेतर्फे करण्यात येत आहे. या कार्यक्रमाचे आयोजन राणी दुर्गावती बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष डॉ. प्रकाश शेडमाके, कृती समितीचे अध्यक्ष श्री प्रदीप मसराम, कोषाध्यक्ष प्रशांत उईके आणि सहसचिव दशरथ मसराम तसेच दीपक कुलसुंगे, रतन कुमार टेकाम, मनोहर कोरेटीसह समस्त पदाधिकारी यावेळी परिश्रम घेत आहे.

### श्रीमती श्वेता शेखर किनखेडे यांचे निधन



श्रीमती श्वेता शेखर किनखेडे यांचे शनिवारी सकाळी प्रदीर्घ आजाराने निधन झाले .मृत्यूसमयी त्यांचे वय ६३ वर्षे होते .त्यांच्या पश्चात अनघा धनंजय नंदनपवार आणि प्राची हिमांशू सेवलकर दोन मुली तसेच जावई आणि बराच मोठा आप्तेष्ट परिवार आहे .त्यांच्या पार्थिवावर अंबाझरी दहनघाट येथे आज अंत्यसंस्कार झाले .

# महानगरपालिका निकालानंतर नागपुरात आयकर विभागाची मोठी कारवाई

## सुपारी व्यावसायिकांवर एकाचवेळी धाडसत्र, खळबळ

**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**

नागपूर :महानगरपालिका निवडणुकीच्या निकालानंतर राजकीय वर्तुळात विविध चर्चा सुरू असतानाच शनिवारी सकाळपासून उपराजधानी नागपुरात आयकर विभागाच्या पथकाने मोठी कारवाई करत सुपारी व्यावसायिकांवर धाडसत्र सुरू केल्याने व्यावसायिक वर्तुळात खळबळ उडाली आहे. मध्य भारतात सडक्या सुपारीचा मोठा व्यवसाय नागपुरातून चालतो. या व्यवसायातील प्रमुख व्यापारी असलेले राजू अण्णा, अल्ताफ कलीवाला, गनी कलीवाला आणि आसिफ कलीवाला यांच्या व्यावसायिक प्रतिष्ठाने, कार्यालये तसेच निवासस्थानी आयकर विभागाच्या पथकाने एकाचवेळी छापे टाकले. मुंबईतील सुपारी व्यावसायिक फारूक यांच्याशी असलेल्या व्यावसायिक संबंधांच्या आधारे ही कारवाई करण्यात आल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले. राजू अण्णा यांच्या कामठी आणि शांतिनगर येथील निवासस्थानी, तर गनी कलीवाला यांच्या गोदामांवर सशस्त्र पोलीस बंदोबस्त आणि श्वान पथकासह आयकर विभागाच्या अधिकाऱ्यांनी धडक दिल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. कलमना तसेच मां उमिया औद्योगिक परिसरात सुपारी व्यावसायिकांची मोठी गोदामे असून तेथेही तपास सुरू असल्याची माहिती आहे. आयकर चुकवेगिरीच्या संशयावरून ही व्यापक कारवाई करण्यात आली असून, तपासादरम्यान संपत्तीशी संबंधित काही आक्षेपार्ह कागदपत्रे आणि आर्थिक व्यवहारांचे पुरावे हाती लागल्याची माहिती सूत्रांनी दिली. ही कारवाई दिवसभर सुरू होती. दरम्यान, या धाडीमुळे नागपुरातील सुपारी व्यवसाय क्षेत्रात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, आयकर विभागाच्या पुढील कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या अध्यक्षपदाची श्रीमती वल्सा नायर- सिंग यांनी घेतली शपथ

**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**





नागपूर : भारतीय प्रशासकीय सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी श्रीमती वल्सा नायर- सिंग यांना महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या अध्यक्षपदाची व गोपनीयतेची शपथ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित कार्यक्रमात दिली. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचे स्वागत केले.

कार्यक्रमास ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे , अपारंपरिक ऊर्जा मंत्री अतुल सावे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला आदींसह सबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## सत्तेच्या जोरावर नागपूरच्या लोकशाहीचा सौदा - डॉ. नितीन राऊत

**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**

नागपूर - नागपूर महानगरपालिकेच्या 151 जागांच्या निवडणूक निकालातून शहराच्या लोकशाहीचा सत्तेच्या जोरावर सौदा करण्यात आल्याचे गंभीर आरोप राज्याचे माजी मंत्री व आमदार डॉ. नितीन राऊत यांनी केले आहे. भाजपला 102 जागांचे बहुमत मिळाले असले, तरी हा कौल जनतेच्या मूलभूत प्रश्नांवरील विश्वासाचा नसून सत्ता, पैसा आणि प्रशासकीय यंत्रणांच्या गैरवापरातून घडवून आणलेला असल्याचा दावा त्यांनी केला. नागपूर शहर गेल्या अनेक वर्षांपासून खड्डेमय रस्ते, ढासळलेल्या आरोग्य सुविधा, शिक्षणातील दुरवस्था, पाणीटंचाई आणि वाढती महागाई अशा समस्यांनी त्रस्त आहे. मात्र या ज्वलंत प्रश्नांवर जनतेच्या असंतोषाचे प्रतिबिंब निवडणूक निकालात उमटले नाही, ही बाब लोकशाहीसाठी अत्यंत चिंताजनक असल्याचे डॉ. राऊत म्हणाले. विरोधी पक्षांचे मतविभाजन, धर्म व जातीच्या आधारावर झालेले ध्रुवीकरण आणि सत्ताधाऱ्यांची एकहाती पकड यामुळे लोकशाहीची मुळे कमकुवत होत असल्याचा इशाराही त्यांनी दिला. महानगरपालिका ही शहराच्या सर्वांगीण विकासासाठी असलेली स्वायत्त संस्था असून ती एका पक्षाच्या सत्ताकेंद्रात रूपांतरित होणे ही बाब धोकादायक असल्याचे मत डॉ. राऊत यांनी व्यक्त केले. “हा निकाल नागपूरच्या विकासाचा जनादेश नसून लोकशाहीच्या मूल्यांवर झालेल्या आघाताचे प्रतीक आहे,” असे स्पष्ट करत काँग्रेसचे जेष्ठ नेते डॉ. नितीन राऊत यांनी सत्ताधाऱ्यांनी जाहिरातबाजी व दिखाऊ विकास नव्हे तर प्रत्यक्ष जनहिताचा कारभार करावा, अन्यथा येत्या काळात नागरिकांचा रोष अधिक तीव्र होईल, असा इशाराही दिला.

## नागपूरला प्रदूषणमुक्त शहर बनवायचेय:सर्व आश्वासने पूर्ण करायची आहेत, नितीन गडकरींच्या विजयी नगरसेवकांना सूचना

**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**




नागपूर महापालिकेत विजय मिळाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि चंद्रशेखर बावनकुळे यांनी विजयी नगरसेवकांचे अभिनंदन करण्यासाठी एकत्र आले होते. यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी संवाद साधला तसेच गडकरी यांनी नागपूरला सुंदर आणि प्रदूषणमुक्त शहर बनवायचे असल्याचे निर्देश नवनिर्वाचित नगरसेवकांना केले आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, नागपूरच्या जनतेने मोठा विजय आपल्याला दिला आहे. महाराष्ट्रात एकूणच भाजपने या निवडणुकीत मोठा रेकॉर्ड केला आहे आणि 29 पैकी 25 महापालिकांमध्ये आपली सत्ता आली आहे. महाराष्ट्रातला सर्वात मोठा पक्ष भाजपच आहे हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. मी सगळ्यांचे अभिनंदन करतो. मला विश्वास आहे, येत्या काळात विकासाचा अजेंडा जो आहे, तो आपण वेगाने पुढे नेऊ.

नितीन गडकरी म्हणाले, आपल्या नागपूरमध्ये यश मिळाले आहे, आपल्या शहरात जे काही उत्तम कार्य आपण केले, त्याचा परिणाम म्हणून आपल्याला चांगले यश मिळाले आहे. आपण आश्वासन दिले आहे की प्रदूषणमुक्त शहर आपण तयार करणार आहोत. ही वचने आपल्याला पूर्ण करायचे आहे. या निवडणुकीत आपल्या कार्यकर्त्यांनी, आमदारांनी उत्तम काम केले आहे.

पुढे बोलताना नितीन गडकरी म्हणाले, नागपूर शहरात, विदर्भात आणि महाराष्ट्रात चंद्रशेखर बावनकुळे यांनी खूप काम केले आहे. त्यांनी परिश्रम करून विजय मिळवून दाखवला आहे. येणाऱ्या काळात जसा आपल्याला आनंद आहे, तशी जबाबदारी वाढली आहे. जे नगरसेवक निवडून आले आहेत, जनतेच्या ज्या अपेक्षा आहेत, जे प्रश्न आहेत, ते सोडवायचे आहेत.

## प्रभाग ४ मध्ये मुस्लिम समाजाला तिकीट न दिल्याने काँग्रेसचा पराभव – शायदा खान यांचा आरोप

**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**

नागपूर :- नागपूर महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक ४ मध्ये काँग्रेस पक्षाचा पराभव झाला असून, या पराभवाला पक्षातील वरिष्ठ नेत्यांची चुकीची रणनीती कारणीभूत असल्याचा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी अल्पसंख्यक विभागाच्या प्रदेश सचिव शायदा अहमद खान यांनी केला आहे. शायदा खान यांनी निवडणुकीपूर्वी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस अल्पसंख्यक विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष व राज्यसभेचे खासदार इमरान प्रतापगढी, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, नागपूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष व आमदार विकास ठाकरे, उत्तर नागपूरचे आमदार डॉ. नितीन राऊत, आमदार अभिजीत वंजारी तसेच प्रदेश अल्पसंख्यक विभागाचे अध्यक्ष डॉ. वजाहत मिर्झा यांना लेखी पत्र पाठवून महानगरपालिका निवडणुकीत अल्पसंख्यक विभागासाठी ३० टक्के तिकीट देण्याची मागणी केली होती. मात्र, या मागणीकडे वरिष्ठ नेत्यांनी दुर्लक्ष केल्याचे त्यांनी सांगितले. प्रभाग क्रमांक ४ मध्ये मुस्लिम समाजाला तिकीट न दिल्यामुळे समाजामध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आणि त्याचा थेट परिणाम निवडणूक निकालावर झाला. वरिष्ठ नेत्यांच्या चुकीच्या धोरणामुळे येथील राजकीय समीकरणे बिघडली, असा आरोपही शायदा खान यांनी केला. त्यांनी सांगितले की, आमदार डॉ. नितीन राऊत यांनी उत्तर नागपूरातील प्रभाग ४ साठी तीन तिकीटांची मागणी केली होती. मात्र काही वरिष्ठ नेत्यांनी मुस्लिम समाजाला तिकीट देण्यास विरोध केल्याने अल्पसंख्यक समाजाचा उमेदवार वंचित राहिला. २०१७ मधील सामाजिक व राजकीय समीकरणांचा विचार केला असता, प्रभाग ४ मधील अनुसूचित जाती महिला, सर्वसाधारण खुली महिला, ओबीसी पुरुष व सर्वसाधारण खुल्या पुरुष अशा चारही जागांवर काँग्रेसला



विजय मिळू शकला असता, असेही त्यांनी स्पष्ट केले. शायदा खान या प्रभाग क्रमांक ४ च्या काँग्रेस पक्षाच्या निवडणूक प्रभारी असून, त्यांनी पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष व प्रदेशाध्यक्षांकडे पक्षाशी बंडखोरी करणाऱ्यांवर कठोर कारवाई करून त्यांना निलंबित करण्याची मागणी केली आहे.

## फार्मसीच्या विद्यार्थ्यांची ग्रामीण रुग्णालयाला भेट

**दिव्य वतन /प्रतिनिधी**




आमगाव: डी. फार्मसी अभ्यासक्रमाचे शिक्षण पूर्ण करून विद्यार्थ्यांना रुग्णालयांमध्ये फार्मासिस्ट म्हणून रोजगाराची खूप संधी उपलब्ध आहे.

पुस्तकीज्ञाना सोबतच विद्यार्थ्यांना प्रत्यक्षात विविध रुग्णालयात असलेल्या विविध विभागांची कामकाज कसे चालते याच्या अनुभव व्हावा म्हणून, आमगाव येथील भवभुती शिक्षण संस्था द्वारा संचालित श्री लक्ष्मणराव मानकर इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी च्या द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र शासन संचलित ग्रामीण रुग्णालय आमगाव व आमगाव हॉस्पिटल सेंटरला भेट दिली,

यात विद्यार्थ्यांना ग्रामीण रुग्णालयात असलेले आयुष विभाग, क्षयरोग विभाग, एच आय व्ही विभाग, बाह्य रुग्ण विभाग, अंतर रुग्ण विभाग,व औषधी वितरण विभागांची ओळख होऊन प्रत्यक्षात कामकाज अनुभवता आले.

सदर भेटीदरम्यान रुग्णालयाचे मेडिकल ऑफिसर डॉ. मेश्राम, डॉ. गायधने, डॉ. भावना कुंभलकर तसेच फार्मसीस्ट अन्सू अंतुलकर व चीफ नर्स वलथरे मॅडम यांनी आरोग्य सेवा प्रणालीची ओळख करून दिली व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या यशस्वी रुग्णालय भेटीसाठी महाविद्यालयाचे प्रा. महेंद्र तिवारी, प्रा. दीक्षा खोब्रागडे, प्रा. परमेश्वर वानखेडे, सजल पसीने व अग्रवाल यांनी परिश्रम घेतले. संस्थेचे संचालक श्री केशव भाऊ मानकर, ॲडव्हायझर डॉ. डी.के. संघी ,प्राचार्य डॉ. तुलसीदास निंबेकर यांनी शिक्षक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# लता मंगेशकर हॉस्पिटल येथील हृदयरोग तज्ञांनी यशस्वीरित्या हाताळली भारतातील एकमेव दुर्मिळ केस

## रुग्णाचे हृदय आढळले उजव्या बाजूला, आकस्मिक परिस्थितीत नि:शुल्क अँजिओप्लास्टी व उपचार करुन वाचविले रुग्णाचे प्राण

**दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी**

सावनेर येथील 70 वर्षांच्या एका आजींच्या छातीत दुखून श्वास घेण्यास त्रास होत असल्याने त्या लता मंगेशकर हॉस्पिटल, हिंगणा रोड, नागपूर येथे आल्या. रुग्णालयात पोहोचताच त्यांची तात्काळ तपासणी करण्यात आली आणि ईसीजी काढण्यात आला. ईसीजीमध्ये हृदयाशी संबंधित बदल दिसून आले. पुनर्तपासणी करताना रुग्णालयाचे सुप्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ हितेंद्र भागवतकर यांना एक वेगळी गोष्ट लक्षात आली, ती म्हणजे इको तपासणी करताना हृदय नेहमी जिथे असते तिथे दिसत नव्हते. त्यामुळे त्यांना शंका आली की, रुग्णाचे हृदय कदाचित उलट बाजूला असावे. तपासणी केल्यानंतर असे लक्षात आले की, त्या आजींचे हृदय उजव्या बाजूला आहे. ही भारतातील एकमेव फारच दुर्मीळ जन्मजात अवस्था आहे आणि 70 च्या वयात पहिल्यांदा ती आढळणे अतिशय दुर्मिळ आहे. हे दुर्मीळ निदान केल्यानंतर हृदयरोगतज्ञ डॉ हितेंद्र भागवतकर यांनी रुग्णाची तात्काळ अँजिओग्राफी केली. हृदयाची रचना वेगळी असल्यामुळे ही प्रक्रिया खूप अवघड आणि जटिल होती. कारण हृदयाच्या सर्व रक्तवाहिन्या उलट बाजूने होत्या. तरीसुद्धा डॉक्टरांच्या अनुभवी टीमने यशस्वीपणे अँजिओग्राफी केली. त्यामध्ये हृदयाच्या मुख्य रक्तवाहिनीत,



म्हणजेच LAD धमनीमध्ये 90% अडथळा आढळून आला. त्यानंतर रुग्णावर यशस्वी अँजिओप्लास्टी करण्यात आली. महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत रुग्णाचे सर्व उपचार व प्रक्रिया मोफत करण्यात आले. सध्या आजींची प्रकृती ठणठणीत आहे. उपचारानंतर कोणतीही अडचण आली नाही आणि त्यांना चांगल्या अवस्थेत घरी पाठविण्यात आले. मुख्य म्हणजे, बाहेरील रुग्णालयात त्यांना हृदयविकाराचा झटका आला आहे, असे सांगण्यात आले होते आणि त्यानुसार औषधेही देण्यात आली होती. हृदयरोगतज्ञ डॉ हितेंद्र भागवतकर यांच्या नेतृत्वात लता मंगेशकर हॉस्पिटल, हिंगणा रोड, नागपूर येथे हृदयरोग विभाग व हृदय शास्त्रक्रिया विभाग कार्यरत असून शासकीय योजनेअंतर्गत आतापर्यंत 7000 पेक्षा जास्त नि:शुल्क अँजिओप्लास्टी करण्यात आल्या आहेत. ही भारतातील एकमेव दुर्मिळ केस यशस्वीरित्या हाताळल्याबद्दल संस्थेचे उपाध्यक्ष आमदार डॉ आशिषराव देशमुख, एनकेपी साळवे वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ सजल मित्रा, उपअधिष्ठाता व वैद्यकीय अधीक्षक डॉ नितीन देवस्थळे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ अनुज तिवारी, उपवैद्यकीय अधीक्षक डॉ सुश्रुत फुलारे आदींनी हृदयरोग विभाग चमूचे अभिनंदन केले आहे.

## पत्रकार भवन ट्रस्टचे अध्यक्षपदी प्रदीप कुमार मैत्र, सचिवपदी शिरीष बोरकर तर कोषाध्यक्षपदी ब्रम्हाशंकर त्रिपाठी यांची निवड







**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**

नागपूर : टिळक पत्रकार भवन ट्रस्टच्या संचालक पदाची निवडणूक नुकतीच पार पडली. या संचालक मंडळातून अध्यक्षपदी प्रदीपकुमार मैत्र यांची एकमताने निवड करण्यात आली. तसेच सरचिटणीसपदी शिरीष बोरकर यांची निवड करण्यात आली. उपाध्यक्षपदी प्रभाकर दुपारे तर कोषाध्यक्षपदी ब्रह्माशंकर त्रिपाठी सहसचिवपदी विवेक पुराडभट यांची निवड करण्यात आली.

संचालक मंडळात सदस्यपदी* विनोद देशमुख, जोसेफ राव, विश्वास इंदूरकर, संजीब गांगुली, महेश उपदेव, भूपेंद्र गणवीर, महेंद्र आकांत यांची निवड करण्यात आली असून नामनियुक्त सदस्य म्हणून धर्मेंद्र जोरे यांची निवड करण्यात आली. या कार्यकारणीचा कार्यकाळ सहा वर्षाचा राहील.

## महत्त्वाचे...

### अमरावती महापालिका निवडणुकीत अपक्षांना सपशेल नाकारले




अमरावती महापालिका निवडणुकीच्या शुक्रवारी झालेल्या मतमोजणीत मतदारांनी अपक्ष उमेदवारांना सपशेल नाकारल्याचे स्पष्ट झाले आहे. एकूण ६६१ उमेदवारांपैकी १२० जणांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढवली होती, परंतु एकाही उमेदवाराला विजय मिळवता आला नाही.पालिका सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अपक्ष उमेदवारांना किमान २० ते कमाल दीड हजार मते मिळाली आहेत. महापालिकेच्या २२ प्रभागांमधील ८७ जागांसाठी ही निवडणूक झाली. या निवडणुकीत सर्वच प्रभागांमध्ये चुरस होती आणि अपक्षांनाही काही जागा मिळतील असा अंदाज होता, मात्र तो फोल ठरला.माघार घेण्याच्या अंतिम दिवसापर्यंत एकूण ६६१ उमेदवारांनी आपली उमेदवारी कायम ठेवली होती. यापैकी ५४१ उमेदवार विविध राजकीय पक्षांचे होते, तर १२० उमेदवार अपक्ष म्हणून रिंगणात उतरले होते. या १२० अपक्ष उमेदवारांपैकी एकालाही मतदारांनी विजयापर्यंत पोहोचू दिले नाही.मतदारांनी अपक्षांना नाकारण्यामागे काही प्रमुख कारणे असल्याचे दिसून येते. अपक्ष उमेदवार निवडून आल्यास काही वेळा 'घोडेबाजार' होण्याची शक्यता असते, ज्यामुळे मतदारांना नुकसान सोसावे लागते. तसेच, अपक्षांना राजकीय पाठबळ नसल्याने ते प्रभागाच्या विकासासाठी सत्ताधाऱ्यांकडून पुरेसा निधी मिळवू शकत नाहीत, अशी मतदारांची धारणा आहे.

### उमरखेड दगडफेक; 16 जणांविरुद्ध गुन्हे



उमरखेड - शहरातील नाग चौक परिसरात बुधवारी सायंकाळी दोन गटात झालेल्या हाणामारीत मध्यस्थी करून भांडणे थांबवण्याचा प्रयत्न करणाऱ्या सहायक पोलिस उपनिरिक्षक देविदास वाघमारे यांच्यावरच प्राणघातक हल्ला करणाऱ्या दोन्ही गटातील १६ जणावर पोलिसात गुन्हे दाखल केले. संशयित आरोपी शेख शाहरुख शेख फतरु वय २८, शेख अक्रम उर्फ अक्कु शेख मुस्सा वय २५, अन्सार शेख इस्त्राइल शेख वय ३२, अजहर वय ३२, कुणाल अनिल पटोणे वय ३३, चिलु सुनील देंडवाल वय ३३, विजय राजाराम डागर वय २५, कालु टेंडवाल वय २०, सुदेश शामलाल बिर्ला वय २४ सर्व रा. उमरखेड व इतर अज्ञात सहा ते आठ जणावर गुन्हे दाखल केले आहे. या प्रकरणी पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, यवतमाळातील खासगी रूग्णालयात उपचार घेणाऱ्या देविदास वाघमारे यांनी पोलिसात दिलेल्या तक्रारीनुसार, सहायक पोलिस उपनिरिक्षक देविदास वाघमारे डीएसबीमध्ये मागील दोन वर्षापासून कार्यरत आहे. वाघमारे यांना माहिती मिळाली की, दोन गटात हाणामारी सुरू आहे.दरम्यान ते लगेच नाग चौक येथे रवाना झाले. तेथे गेल्यानंतर पाहिले असता दोन्ही गटाचे मिळून सुमारे १५ ते १६ लोक एकमेकांना जिवे मारण्याचा उद्देशाने हल्ला करत होते. त्यापैकी शेख शाहरुख रुख शेख फतरु, शेख अक्रम उर्फ अक्कु शेख मुस्सा, अन्सार शेख इस्त्राइल शेख, अजहर यांच्यासोबत तीन ते चार तरूण कुणाल अनिल पटोणे, चिलु सुनिल देंडवाल, विजय राजाराम डागर, कालु देंडवाल, सुदेश शामलाल बिर्ला व इतर तीन ते चार तरूण त्या जामावात सामील होते.

# आमचा पराभव जनतेने नाही, नवनीत राणांनी केला

## त्यांना पक्षातून काढा, अमरावतीतील 22 पराभूत उमेदवारांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**

अमरावती- महानगरपालिका निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर अमरावतीत भारतीय जनता पक्षामध्ये मोठा अंतर्गत स्फोट झाला आहे. भाजपच्या २२ पराभूत उमेदवारांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून पक्षाच्या नेत्या नवनीत राणा यांना पक्षातून निष्कासित करण्याची मागणी केली आहे. " आमचा पराभव जनतेने नाही, नवनीत राणांनी केला. नवनीत राणा यांनी निवडणुकीच्या शेवटच्या पाच दिवसांत उघडपणे भाजपच्या विरोधात प्रचार करून पक्षाशी गद्दारी केली," असा खळबळजनक आरोप या उमेदवारांनी केला आहे. अमरावती महानगरपालिकेच्या ८७ जागांपैकी भाजपने २५ जागा जिंकत सर्वात मोठा पक्ष म्हणून स्थान मिळवले आहे. मात्र, स्पष्ट बहुमतासाठी भाजपला युवा स्वाभिमानी पक्षाच्या पाठिंब्याची गरज भासणार आहे. या निवडणुकीत भाजपचे अनेक उमेदवार पराभूत झाले. तर आमदार रवी राणा यांच्या युवा स्वाभिमानी पक्षाने भाजपसोबत युती न करता स्वबळावर निवडणूक लढवली होती. निवडणुकीत पराभूत झालेल्या भाजपच्या २२ उमेदवारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवलेल्या पत्रात थेट नवनीत राणा यांच्यावर पक्षविरोधी कारवाया केल्याचा आरोप केला आहे.

'भाजपाच्याच वरिष्ठ नेत्या नवनीत कौर राणा यांनी पक्षाशी खुलेआम गद्दारी केली आहे. भाजपात राहून भाजपाचाच काटा काढण्याचे काम नवनीत कौर राणा यांनी केले आहे. नवनीत राणा यांना भाजपातून बाहेरचा रस्ता न दाखवल्यास त्या भविष्यात अमरावती शहरात भाजपाचा पूर्णपणे नायनाट केल्या शिवाय राहणार नाहीत.



नवनीत राणा यांनी प्रथम भाजपाचा गड असलेल्या प्रभागात स्वतःचे उमेदवार टाकून त्या संपूर्ण पॅनेलवर वरवंटा कसा फिरवला जाईल, याचे नियोजन केले. एकीकडे भाजपाच्या सर्व पोस्टर्सवर स्वतःचा मोठा फोटो टाकून घेतला. त्यासाठी आमच्यावर शहर अध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांचा दबाव होता. नंतर नवनीत राणा यांनी डॉ. धांडे यांच्या माध्यमातून संपूर्ण संघटना घरी बसवली. डॉ. धांडे यांचा वापर करून अधिकृत उमेदवारांची उमेदवारी मागे घेतल्याचे पत्र काढून त्या पत्राचा वापर शहरभर केला. संघटनेचे पदाधिकारी निवडणुकीत कुठेच दिसत नव्हते. शेवटच्या पाच दिवसांत नवनीत राणा खुलेआम भाजपाच्या विरोधात प्रचारात उतरल्या, असा आरोप भाजपच्या २२ उमेदवारांनी पत्रात केला आहे. "नवनीत राणा यांना भाजपातून बाहेरचा रस्ता न दाखवल्यास त्या भविष्यात अमरावती शहरात भाजपाचा पूर्णपणे नायनाट केल्या शिवाय राहणार नाहीत. शेवटच्या पाच दिवसात नवनीत राणा खुलेआम भाजपाच्या विरोधात प्रचारात उतरल्या होत्या. भाजपचे उमेदवार डमी आणि युवा स्वाभिमानचे उमेदवार हेच खरे भाजपाचे उमेदवार असा आक्रमक प्रचार केला, असा आरोपही या उमेदवारांनी केला.

आम्ही सर्वांनी लोकसभा निवडणुकीत नवनीत राणा आणि विधानसभा निवडणुकीत आ. रवी राणा यांच्यासाठी झोकून काम केलं.. पण नवनीत राणा यांनी जाहीरपणे आम्हालाच गद्दार ठरवून आमच्या सारख्या सामान्य कार्यकर्त्यांना उद्ध्वस्त केलं. भाजपाच्या प्रभावक्षेत्रात भाजपाला मूठमाती देऊनच राणा दाम्पत्याने मनपा निवडणुकीत आपली राजकीय ताकद सिद्ध केली. पत्नीला स्टार प्रचारक' भाजपा नेता दर्शवून भाजपा उमेदवारांना योजनापूर्वक पाडण्याचे काम राणा दाम्पत्याने केले. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रभावक्षेत्रात राणा दाम्पत्य फिरकले देखील नाही. तिथे भाजपा कमी करण्याची छुपी व्यूहरचना त्यांनी आखली. आम्ही हरलो. पराभव आम्हाला मान्य आहे. पण आमचा पराभव जनतेने नव्हे नवनीत राणा यांनी गद्दारी करून केला, असेही या पत्रात म्हटले आहे.या पत्रावर भाजप नेत्या नवनीत राणा यांनी देखील प्रतिक्रिया दिली. मी कोणालाही उत्तर देण्यासाठी काम करत नाही मी भाजपसाठी काम करते, असे नवनीत राणा यांनी म्हटले. कोणी काही टीका केली तरी ते मंचावर येऊनच बोलू शकतात.

# पाच हजारांची लाच घेताना उपकृषी अधिकारी रंगेहाथ अटक

## सालेकसा तालुक्यात ACB ची यशस्वी कारवाई

**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**

गोंदिया : प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना अंतर्गत अनुदान मंजुरीसाठी लाच मागणाऱ्या उपकृषी अधिकाऱ्यावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मोठी कारवाई केली आहे. सालेकसा तालुक्यातील उपकृषी अधिकारी रमेश मारोतराव टाकरस, वय ५० वर्षे, याला पाच हजार रुपयांची लाच स्वीकारताना ACB पथकाने रंगेहाथ पकडले आहे.

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना – पीएमकेएसवाय २.० अंतर्गत रोटाव्हेटर यंत्रासाठी ४० हजार रुपयांचे अनुदान मंजूर करून देण्याच्या मोबदल्यात आरोपी उपकृषी अधिकारी रमेश टाकरस याने तक्रारदार शेतकऱ्याकडून लाचेची मागणी केली होती.




तक्रारदार ५० वर्षीय शेतकऱ्याने १७ जून २०२५ रोजी सालेकसा येथे एक लाख पाच हजार रुपयांचा रोटाव्हेटर खरेदी करून अनुदानासाठी अर्ज दाखल केला होता. मात्र अनुदान मंजुरीसाठी आरोपीने सुरुवातीला दहा हजार रुपयांची मागणी केली.

१८ डिसेंबर २०२५ रोजी अनुदानाची रक्कम शेतकऱ्याच्या बँक खात्यात जमा झाली असतानाही आरोपीने १२ जानेवारी २०२६ रोजी पुन्हा दहा हजार रुपयांची मागणी केली. लाच देण्यास नकार देत शेतकऱ्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली.

ACB पथकाने १२ व १६ जानेवारी रोजी पडताळणी करून १६ जानेवारी २०२६ रोजी सापळा रचला. या सापळ्यात आरोपीने तक्रारदाराकडून पाच हजार रुपयांची लाच स्वीकारताच त्याला रंगेहाथ पकडण्यात आले.

आरोपीच्या अंगझडतीत ६,०८० रुपये आढळून आले असून ती रक्कम परत देण्यात आली आहे. तसेच आरोपीचा पाच हजार रुपये किमतीचा सॅमसंग कंपनीचा मोबाईल जप्त करण्यात आला आहे. आरोपीच्या घरझडतीची कारवाई सुरू असून त्याच्याविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम ७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

# पराभवाच्या रागातून विजयी उमेदवारावर जीवघेणा हल्ला

## अकोटमध्ये पोलिसांचा लाठीमार, भाजपचे विजयी उमेदवार शरद तुरकर जखमी

**दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी**

अकोट - मनपा निवडणुकीत भाजपच्या नवनिर्वाचित नगरसेवकावर प्राणघातक हल्ला झाल्याची घटना अकोट फैल भागात शुक्रवारी रात्री नऊच्या सुमारास घडली. शरद श्रीराम तुरकर असे हल्ला झालेल्या नगरसेवकाचे नाव आहे. या भागात तोडफोड देखील झाली. पोलिसांनी सौम्य लाठीमार केला. या घटनेमुळे शहरात मोठी खळबळ उडाली. जखमी नगरसेवकाला रुग्णालयात दाखल करण्यात आले असून उपचार सुरू आहेत.

शहरातील प्रभाग क्रमांक 2 'ब'मधील भाजपचे विजयी उमेदवार शरद तुरकर यांच्यावर जीवघेणा चाकूहल्ला. भाजपचेच प्रभाग 2 'ड'गटातील पराभूत उमेदवार नितीन राऊत आणि समर्थकांनी हल्ला केल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान, या घटनेनंतर वाहनांच्या तोडफोडीनंतर



पोलिसांनी सौम्य लाठीमार केला.निवडणूक निकालानंतर राजकीय वाद पेटला आहे. अकोट फैल भागात भाजपच्या नवनिर्वाचित नगरसेवकावर भाजपच्याच पराभूत उमेदवार गटाकडून चाकू हल्ला करण्यात आला.

या प्रभागात तीन जागा //"एआयएमआयएम`` ने जिंकल्या, तर एकाजागेवर भाजपने काँग्रेसचा पराभव केला. प्रभाग क्रमांक दोन ब मध्ये भाजपचे उमेदवार शरद तुरकर यांनी काँग्रेसचे उमेदवाराचा दोन हजार 200 मतांनी पराभव केला. या विजयामुळे प्रभागातील भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण होते. त्यातूनच भाजपचे नवनिर्वाचित नगरसेवक शरद तुरकर यांची अकोट फैल भागातून रॅली काढण्यात आली. त्यानंतर प्रभागात असताना नवनिर्वाचित नगरसेवक शरद तुरकर यांच्यावर अचानक हल्ला करण्यात आला.

मिळालेल्या माहितीनुसार, भाजप नगरसेवक शरद तुरकर हे सत्कार स्वीकारण्यासाठी एका ठिकाणी जात असताना त्यांच्यावर भाजपचे पराभूत उमेदवार नितीन राऊत यांच्याकडून हल्ला करण्यात आला. दरम्यान, यावेळी वाद चिघळल्याने दोन्ही गटाचे लोक समोरासमोर आले होते. यावेळी वाहनांची आणि दुकानांची तोडफोड करण्यात आली. परिस्थिती नियंत्रणात न आल्याने पोलिसांकडून सौम्य लाठीचार्ज करण्यात आल्याची माहिती आहे. शरद तुरकर हे हल्ल्यात जखमी झाले असून,त्यांना अकोल्यातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच जिल्हा पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांच्यासह पोलिस अधिकारी घटनास्थळी दाखल झाले आहेत. तर सध्या परिस्थिती नियंत्रणात असून तणावपूर्ण शांतता आहे. पोलिसांत गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया सुरू आहे, असे पोलिसांनी सांगितले.

# ऑनलाईन फसवणूक करणारे छत्तीसगडमधील दोन आरोपी अटकेत

## स्थानिक गुन्हे शाखा व सायबर सेल गोंदियाची धडाकेबाज कारवाई

**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**

गोदिया :बँक खाती मिळवून त्याद्वारे ऑनलाईन आर्थिक गैरव्यवहार करणाऱ्या छत्तीसगडच्या दंतेवाडा येथील दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे.

पोलीस अधीक्षक गोंदिया श्री. गोरख भामरे यांच्या निर्देशानुसार आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम अहेरकर यांच्या आदेशाने रामनगर पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग सुरू असताना पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली.

हॉटेल ऑर्चिड, कुडवा नाका, तिरोडा रोड, गोंदिया येथे काही इसम नागरिकांना पैशाचे आमिष दाखवून त्यांच्या नावावर बँक खाती घेऊन ऑनलाईन फसवणूक करत असल्याची माहिती पोलिसांना प्राप्त झाली.

माहितीच्या आधारे पोलिस पथकाने हॉटेल ऑर्चिड येथे छापा टाकला असता, छत्तीसगड राज्यातील दोन इसम मागील दोन दिवसांपासून तेथे वास्तव्यास असल्याचे निष्पन्न झाले. तपासादरम्यान आरोपींची नावे शेख आसिफ शेख अहमद (वय २७) रा. दंतेवाडा,सचिनकुमार संतोष पटेल (वय २२) रा. दंतेवाडा, छत्तीसगड अशी असल्याचे उघड झाले.आरोपी पैशाचे आमिष देऊन स्थानिक नागरिकांच्या नावावर बँक खाती उघडत, त्या खात्यांचे संपूर्ण किट, सिमकार्ड व मोबाईल प्राप्त करून ऑनलाईन गेमिंगद्वारे आर्थिक व्यवहार करत असल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे.

पोलिसांनी केलेल्या झडतीत बँक ऑफ इंडियाचे करंट खाते, चेकबुक, सिमकार्ड, तीन अँड्रॉइड मोबाईल फोन असा सुमारे ३२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.या प्रकरणी रामनगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा क्रमांक ४५/२०२६ अंतर्गत भारतीय न्याय संहिता २०२३ मधील संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम अहेरकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा व सायबर सेलच्या पथकाने यशस्वीपणे पार पाडली आहे.

# येवद्यात जलपुरवठा चौकशीवर नागरिकांना संशय

## मानवाधिकार आयोगाच्या पथकावर थातुरमातुर चौकशीचा आरोप

**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**

अकोला येवदा गावात अशुद्ध जलपुरवठा आणि पाइपलाईन गळतीबाबत दाखल तक्रारीच्या चौकशीवर नागरिकांनी संशय व्यक्त केला आहे. महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाच्या चौकशी पथकाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाशी संगनमत करून चौकशी केल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे.

सामाजिक कार्यकर्ते ओमप्रकाश शर्मा, नितीन बढे आणि गावातील इतर नागरिकांनी महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोग, मुंबई येथे या संदर्भात तक्रार दाखल केली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने आयोगाकडून पोलीस निरीक्षक (अन्वेषण विभाग)



दयानंद सरवदे आणि त्यांचे सहकारी स्वप्निल पाटील यांनी १४ जानेवारी रोजी येवदा गावात पाहणी केली. मात्र, हे पथक महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांसह त्यांच्याच वाहनातून गावात पोहोचल्याने अनेकांनी आश्चर्य व्यक्त केले.तक्रारदार ओमप्रकाश शर्मा यांनी चौकशीदरम्यान आपल्यावर दबाव टाकण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप केला आहे.

जीवन प्राधिकरणाने आधीच ठरवून काही निवडक व्यक्तींचे जबाब नोंदवले. परंतु, गावाच्या जलपुरवठा समस्येशी थेट संबंधित असलेले सरपंच अमानुल्ला पठाण, तंटामुक्ती अध्यक्ष भरत गावंडे आणि इतर ग्रामपंचायत सदस्य यांचे जबाब घेण्यास स्पष्ट नकार देण्यात आला.

# सर्वाधिक जागा मिळवलेल्या भाजपकडून जल्लोष साजरा

## मिठाईचे वितरण; पक्ष कार्यालयाबाहेर ढोल ताशांचा गजर

**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**

अकोला : सर्वात मोठा पक्ष ठरलेल्या भाजपकडून शुक्रवारी संध्याकाळी जल्लोष करण्यात आला. पक्ष कार्यालयाबाहेर आतषबाजी करीत मिठाईचे वितरण करण्यात आले.

मुंबईसह महाराष्ट्रातील २४ नगरपालिकेमध्ये महायुतीला यश मिळाल्याचा दावा भाजपकडून करण्यात आला. महानगरपालिकेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, निवडणूक प्रभारी चंद्रशेखर बावनकुळे, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मंत्री पंकजा मुंडे यांच्या नेतृत्वात भरघोस यश मिळाल्याचे स्थानिक नेत्यांचे म्हणणे आहे. या विजयाबद्दल भारतीय जनता पार्टी कार्यालय डॉ. बाबासाहेब आंबेडकर खुलेनाट्यगृह, जयप्रकाश नारायण चौकात विजयोत्सव साजर करण्यात आला. यावेळी प्रदेश सरचिटणीस आ. रणधीर सावरकर, खा. अनुप धोत्रे, आ. वसंत खंडेलवाल, निवडणूक प्रमुख विजयअग्रवाल, महानगराध्यक्ष जयंत मसणे, संतोष शिवरकर, किशोर पाटील, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख गिरीश जोशी, सिद्धार्थ शर्मा आदी होते.विश्वासाला तडा नाही मूलभूत सुविधांसह अकोलेकरांच्या विश्वासाला तडा जाणार नाही. विकासावर लक्ष केंद्रीत करून भाज प आणि महायुती काम करेल असे आ. रणधीर सावरकर म्हणाले. महायुतीचा महापौर करण्यासाठी जनतेने पाठिंबा दिला. अकोलेकरांच्या आशा आकांक्षा पूर्ण करण्यासाठी आणि मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी भाजपा लोकप्रतिनिधी पार पाडतील, असे खासदार अनुप धोत्रे म्हणाले. भाजपा- राष्ट्रवादी काँग्रेस अकोला महाविकास आघाडीला कौल दिला आहे. जनतेने दाखवलेला विश्वास आणि त्यांची ताकद ही विकासासाठी प्रेरणा देत असल्याची प्रतिक्रिया जयंत मसने यांनी व्यक्त केली.



## ये तो होना ही था...

भाजपने निवडणुकीची समीकरणं बदलून टाकली आहेत, हे अजून विरोधकांना उमगलेलंच नाही. नेत्याभोवती फिरणारे किंवा पक्ष कार्यालयातील खुर्च्या उबवणाऱ्या पदाधिकाऱ्यांच्या जीवावर यापुढे निवडणुकांचे व्यवस्थापन होऊ शकणार नाही. राज्यातल्या २९ महानगरपालिकांच्या निकालाने जो आश्चर्यचकित होईल, त्याला राजकारणातला ओ की ठो कळत नाही, असं खुशाल समजा. तसं लेखी प्रशस्तीपत्र देण्यासही तो पात्र आहे, हे ठरवून टाका. गेली दहा वर्षे भारतीय जनता पक्ष ज्या पद्धतीने निवडणुका जिंकतो आहे, ते स्पष्ट दिसत असूनही कोणी या निवडणुकीत विरोधकांच्या विजयाची आशा लावून बसला असेल, तर त्याला खात्रीने भोळसटच म्हटलं पाहिजे. २०१४ मध्ये विरोधक बेसावध होते. त्यानंतर ते सावध होत गेले; पण त्यांचं सावध होत जाणं आणि त्याच वेळेला त्यांचा शक्तिपात होत जाणं या दोन्ही गोष्टी एकाच वेळी घडल्याने गेल्या दहा वर्षांत विरोधकांना कुठेच डोकं वर काढता आलं नाही. विधानसभेच्या निवडणुकीवेळी महाराष्ट्रातील सर्व विरोधी पक्षांची एकत्र मोट बांधली गेली. पण त्या एकत्रित विरोधी पक्षाचाच 'सुपडा साफ' झाल्याने त्यानंतर ही मोट शिल्लक राहणार नाही, हे गृहीतच होतं. नगरपालिका निवडणुकीपूर्वी मोट बांधण्याचे दिखाऊ प्रयत्न केले गेले. पण, तेही इतके क्षीण, इच्छाशक्तीचा अभाव असलेले होते की त्याने काही होणार नाही, हे दिसत होतं. महानगरपालिका निवडणुकांवेळी तर सगळेच वाघ झाले होते. प्रत्येक जण दुसऱ्यावर गुरकावत होता. त्यांचा एकत्र संसार शक्य नव्हता. अशा विखुरलेल्यांचं जे व्हायचं, तेच झालं. ते सगळे कागदी वाघ असल्याचं मतदारांनी एकच बटन दाबून सिद्ध केलं. विरोधकांमध्ये जे महत्त्वाचे दोन पक्ष होते, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) हे दोन्ही नेतृत्वहीन झाले आहेत. त्यांना ना रणनीती उरली आहे, ना उमेदवारांना बळ देण्याएवढी शक्ती. ठाकरे बंधू तर आपली मुंबईतली जहागिरी वाचवण्यातच जीवाचा आटापिटा करत राहिले. त्यामुळे, भारतीय जनता पक्षाला आता इथे विरोधकच शिल्लक नाही, असं चित्र महाराष्ट्रात निर्माण झालं. संपूर्ण महाराष्ट्रात भाजपला मतदारांनी जो कौल दिला, तो या अर्थाने अपेक्षितच होता.भारतीय जनता पक्षाच्या निवडणुकीच्या तयारीची, सूक्ष्म नियोजनाची, त्यासाठी आवश्यक असलेल्या कार्यकर्त्यांच्या जाळ्याची कल्पना अन्य पक्षांना नाही. निवडणुका जाहीर होण्याआधी महिना - दोन महिना जागे होणारे हे पक्ष आणि भाजपमध्ये खूप अंतर आहे. भाजपने निवडणुकीची समीकरणं बदलून टाकली आहेत, हे अजून विरोधकांना उमगलेलंच नाही. नेत्याभोवती फिरणारे किंवा पक्ष कार्यालयातील खुर्च्या उबवणाऱ्या पदाधिकाऱ्यांच्या जीवावर यापुढे निवडणुकांचे व्यवस्थापन होऊ शकणार नाही. पक्ष नेतृत्वाने दुसऱ्या फळीतील नेत्याला जिल्हा किंवा तालुका बहाल करायचा आणि मग त्या नेत्याने खाली त्याच पद्धतीने प्रभाग - गट - पंचायती बहाल करून टाकायच्या ही राजकारणाची 'काँग्रेसी' घडी केव्हाच कालबाह्य झाली आहे. 'ठाकरे' आणि 'पवार' या दोन ब्रँडसाठी कार्यकर्त्यांनी निष्ठेने आपली फळी धरून ठेवण्याचे दिवसही संपले आहेत. बिहारमध्ये जे लालूप्रसाद यादव यांच्या घराण्याचं झालं, तेच इथेही होईल, हे सांगायला कोणा ज्योतिषाची गरज नाही. लालूंच्यामागे त्यांची मुलं आपापली राजकीय समज घेऊन आपापल्या पद्धतीने मैदानात दिसतात तरी आहेत. इथे दोन्हीकडे पुढच्या पिढीत अंधार आहे. कार्यकर्त्यांच्या पातळीवर जाऊन काम करण्याची, पक्ष बांधण्याची क्षमता कोणातच नाही. मतदार अशांना फार काळ डोक्यावर घेऊन नाचत नाही. नगरपालिका, महानगरपालिका निवडणुकांनंतर जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत ही बाब अधिक स्पष्ट होईल. '

मुंबईचा ठाकरेंचा आणि पुण्याचा पवारांचा' असे माध्यमांनीच उभे केलेले 'गड' किती खोटे आणि पोकळ होते, हे यानिमित्ताने सिद्ध झालं, ते एक बरं झालं. महायुतीतल्या पवारांचा आकार त्यामुळे देशाला कळला. विमनस्क अवस्थेत त्यांनी भाजपवर आणि भाजपच्या नेत्यावर जे वार केले, ते त्यांच्याच अंगलट आले. बारामती मतदारसंघातल्या फुगवलेल्या प्रभावापलीकडे पुण्यात प्रत्यक्ष जमिनीवर यांना काही जागा नाही, हे भाजपच्या पुण्यातल्या नेत्यांनी दाखवून दिलं. 'खिशात नाही आणा अन् मला बाजीराव म्हणा' हे कोणाला लागू होतं, तेच मतदानाच्या आकड्यांनी स्पष्ट केलं. पुण्याच्या पालक मंत्रीपदाचा त्यांचा हट्ट पुढच्या वेळी किती मानला जाईल, कोणास ठाऊक!

महाराष्ट्राने आता 'ट्रिपल इंजिन' स्वीकारलं आहे. 'पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्थानिक निवडणुकांत येण्याची गरजच नाही. आमचा तुमच्यावर विश्वास आहे', हेही मतदारांनी या निवडणुकीत सांगून टाकलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आधुनिक महानगरांबद्दल अनेक कल्पना आहेत. त्या प्रत्यक्षात आणणं आता सोपं जाईल.

बकाल झालेल्या, अस्ताव्यस्त पसरलेल्या शहरांना आकार देता येईल. त्या त्या भागातल्या संस्कृतीला अनुसरून शहरांना चेहरा देता येईल. सर्व शहरं स्वच्छ, नेटकी करण्याला प्राधान्य देण्याची नितांत गरज आहे. अन्य राजकीय पक्षांना सोबत घेऊन ती शक्य तितकी 'फ्लेक्स'मुक्तही करायला हवीत. पुणे, नाशिक, छत्रपती संभाजी नगर, अहिल्यानगर या शहरांकडे नियोजनाच्या दृष्टीने आत्ताच लक्ष दिलं नाही, तर उद्या तिथली परिस्थिती भयावह होईल. या सर्वच शहरांकडे स्वतंत्रपणे लक्ष देण्याची गरज असून मुंबई प्रदेश विकास प्राधिकरणाच्या क्षेत्रातील महानगरपालिकांचा एकत्रित विचार होण्याची गरज आहे. मतदारांनी भरभरून प्रेम व्यक्त केलं आहे. त्याची उतराई करण्याचं आव्हान महायुतीला स्वीकारावं लागेल. संपूर्ण महाराष्ट्र एकहाती हाती येण्याचं महत्त्व भाजपच्या शीर्षस्थ नेत्यांना उत्तम ठाऊक आहे!

# आता विकासाचे बोला...

महानगरपालिका निवडणुकांचा गदारोळ संपला, निकाल लागले आणि विजयी उमेदवारांच्या गळ्यात हार पडले. पण आता मतदारांचा सवाल बदलला आहे. प्रचारात 'विकास' हा शब्द वारंवार ऐकू आला; मात्र प्रत्यक्षात तो कधी आणि कसा दिसणार, हा प्रश्न सामान्य नागरिक विचारू लागला आहे. विजयाचा जल्लोष क्षणिक असतो, पण जबाबदारी मात्र पाच वर्षांची असते. म्हणूनच आजपासूनच नव्हे, तर आत्ताच नवनिर्वाचित नगरसेवकांनी विकासाच्या दिशेने ठोस पावले उचलण्याची गरज आहे, कारण आता ते पक्षाचे नाही, तर प्रभागातील प्रत्येक नागरिकाचे प्रतिनिधी आहेत.महाराष्ट्र राज्यातील २९ महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या रणधुमाळीत विकासाला मत द्या म्हणून मतदार राजाला साद घालणारे उमेदवार निवडून आल्याने 'आता विकासावर बोला' असे प्रभागातील सुजाण नागरिक म्हणू लागले आहेत. तेव्हा काल जरी विजयाचा गुलाल उधळला तरी उद्या म्हणण्यापेक्षा आजपासून विकासकामांना नवनिर्वाचित नगरसेवकांना सुरुवात करावी लागेल. कारण आता ते एका पक्षाचे नसून प्रभागाचे नगरसेवक आहेत याची जाणीव असायला हवी. जवळजवळ नऊ वर्षांनंतर निवडणुका होत आहेत हे सुद्धा लक्षात ठेवायला हवे.

राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र यांच्या १५ डिसेंबर, २०२५ रोजीच्या परिपत्रकानुसार राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकांसाठी निवडणूक कार्यक्रम सन २०२५-२६ जाहीर झाला. त्यानंतर सर्वप्रक्रिया होऊन निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली. यात राज्यातील २७ महानगरपालिकांची मुदत संपली होती, तर जालना व इचलकरंजी येथील दोन महानगरपालिका नवनिर्मित होत्या. राज्यातील एकूण २९ महापालिकांच्या १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान होऊन १६ जानेवारीला निकाल सुद्धा लागला. म्हणजे गुलाल कोण उधळणार याचे उत्तर सुद्धा मतदार राजाला काल मिळाले. तेव्हा मतदान झाले, निकाल लागला, 'आता विकासाचे बोला' असे मतदार राजा व नागरिक नवनिर्वाचित नगरसेवकांना म्हणत आहेत. त्यामुळे राजकीय पक्ष आणि त्या पक्षातून निवडून आलेले नगरसेवक यांनी आपल्या जाहीरनाम्यात दिलेल्या वचनांची पूर्तता करण्यासाठी विकासकामांना गती दिली पाहिजे. ते सुद्धा नि:पक्षपातीपणे सार्वजनिक काम करायला हवे. जरी मी पक्षाचा सभासद असलो तरी लोकप्रतिनिधी आहे. लोकांनी मला निवडून दिले आहे.

तेव्हा लोकांच्या कल्याणासाठी मी काम करेन ते सुद्धा भारतीय संविधानानुसार, देशातील लोकशाहीचा पाया भक्कम करण्यासाठी. तरच आपल्या नगरसेवक पदाच्या कार्यकाळात निवडून आलेल्या प्रभागाचा सर्वांगीण विकास होण्याला मदत होईल. निवडून आलेल्या नगरसेवकांमधून 'महापौर' निवडला जातो. महापौर प्रमुख असतात, तर प्रशासकीय अधिकारी म्हणून महापालिका आयुक्त काम पाहतात. ज्या शहराची लोकसंख्या दहा लाखांपेक्षा जास्त असते अशा शहरी क्षेत्राचे व्यवस्थापन महापालिकेमार्फत करण्यात येते. शहरातील वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन त्यांना विकासात्मक विविध सेवा पुरविण्याचे काम महापालिका करीत असते. शहराचे विकासाच्या दृष्टिकोनातून विकास आराखडा तयार करणे, शहरातील नागरिकांना स्वच्छ पिण्याचे पाणी देणे, रस्ते वाहतूक व्यवस्थित करणे, योग्य ठिकाणी नाला किंवा नद्यांवर पूल बांधणे, रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी गटारे बांधणे, वीजपुरवठा पुरविणे, शहरातील प्रत्येक विभागामध्ये मोफत आरोग्य सेवा देणे, वाहतूक सेवा, घनकचरा विभागामार्फत कचऱ्याची विल्हेवाट लावणे, सुखा कचरा आणि ओला कचरा स्वतंत्र डब्यात गोळा करणे, मुलांना मोफत प्राथमिक शिक्षण देऊन महानगरपालिकेमार्फत शाळा चालविणे. यासाठी विविध नागरी सेवेतून उत्पन्न मिळविले जाते. यात मालमत्ता उत्पन्न कर नागरिकांकडून गोळा करणे, पाणीपट्टी, दंड वसुली आणि राज्य सरकारचे अनुदान इत्यादी मार्गाने उत्पन्न मिळवून ही स्वायत्त संस्था आपली विविध कामे करीत असते. आता निवडून आलेल्या नगरसेवकांना वचनपूर्ती करावी लागेल. राज्यात २९ शहरांमध्ये महानगरपालिका असल्या तरी त्याची फारशी स्वच्छता दिसत नाही. जरी असली तरी स्वच्छतागृह फारच अस्वच्छ असतात. त्याकडे लक्ष देणे गरजचे आहे. कोविडमध्ये त्याचा सर्वांना अनुभव आला असेल. तेव्हा सुंदर शहरासाठी स्वच्छता अतिशय महत्त्वाची असते. तेव्हा घनकचरा व्यवस्थापकांनी कामामध्ये सतर्क राहावे लागेल. त्यावर करडी नजर नगरसेवकांना ठेवावी लागणार आहे.

आपली मातृभाषा मराठी आहे. महापालिकेच्या शाळा बंद पडत चालल्या आहेत. काही ठिकाणी शाळेत मुलेच नाहीत अशी परिस्थिती दिसते. ही मराठीच्या दृष्टीने धोक्याची घंटा आहे. तेव्हा मराठी शाळेची घंटा रोज वाजली पाहिजे. तरच मराठी भाषेला मानाचे पान मिळेल. सध्या राज्यात रोजगारीचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. त्या आनुषंगाने रिकाम्या हातांना रोजगार मिळाला पाहिजे. तो सुद्धा कायमस्वरूपात असावा. अजूनही अनेक शहरात स्वच्छ आणि पुरेसे पाणी नागरिकांना मिळत नाही. तेव्हा स्वच्छ पाणी नागरिकांना कसे मिळेल या दृष्टिकोनातून प्रयत्न करावा. अनेक ठिकाणी रस्ता रुंदीकरणाचे काम सुरू असून पूर्ण झालेले नाही. त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. शहरातील सार्वजनिक बससेवा सुरळीत चालली पाहिजे ती सुद्धा फायद्यात. कारण ती त्या शहराची जीवनवाहिनी असते. त्यात डबलडेकरच्या बससेवा आणि आताच्या आधुनिक बससेवा तोट्यात चालत आहेत. त्यावर योग्य ती उपाययोजना होणे गरजेचे आहे. तसेच वाढत्या विजेच्या दराकडे सुद्धा लक्ष द्यायला हवे. यात सर्वसाधारण नागरिकांना जास्त भाडेवाडीची झळ पोहोचते. निवडणूक काळात लाडक्या बहिणींना आचारसंहितेमुळे अग्रिम लाभापासून वंचित राहावे लागले होते त्यांचे सुद्धा सक्षमीकरण आता झाले पाहिजे. शहरातील पादचाऱ्यांसाठी असणाऱ्या फुटपाथवर अतिक्रमण झालेले आहे

ती जागा मोकळी करणे. त्यात फेरीवाले, दुकानानजीक अवैद्य धंदे, बांधकाम व गाड्या उभ्या करणे यामुळे वाहतुकीची कोंडी निर्माण होत असते. यातून मोकळा श्वास घेण्यासाठी नगरसेवकांनी पुढाकार घ्यावा. महत्त्वाची बाब म्हणजे, महानगरपालिकेच्या शाळांमध्ये जे अतिक्रमण झालेले आहे त्यावर सुद्धा निर्बंध घालावे लागतील.

शहरात मध्यभागी क्रीडा संकुल ज्या ठिकाणी नाहीत त्या ठिकाणी बांधण्यात याव्यात. तेव्हा राज्यातील २९ महानगरपालिकेतील नवनिर्वाचित नगरसेवकांना मतदार राजाने उमेदवाराच्या नावाच्या समोर असणाऱ्या चिन्हाच्या समोरील बटण दाबून विजयी करून दिले आहे. त्यामुळे आपल्या प्रभागातील मतदार राज्याला नगरसेवकांना 'आता विकासाचे बोला' अशी वेळ बोलण्याची येण्यापूर्वी नागरिकांच्या विकासासाठी विकासकामे हाती घ्यावी लागतील.

# मतदारांनी ठरवले, मराठवाडा कोणाचा?

मतदारांचा उत्साह मराठवाड्यात अपेक्षित टक्केवारीपेक्षा कमीच दिसून आला. आश्वासने देऊन पूर्ण करणारा एकही पक्ष नाही, अशी प्रतिक्रिया अनेक मतदारांनी उघड उघड दिली; परंतु भाजपकडून आश्वासने पाळली जातील, असा मतदारांचा कयास आहे.

मराठवाड्यातील पाच महानगरपालिकांसाठी एकदाचे मतदान पार पडले. शुक्रवारीच मतमोजणी असून सायंकाळपर्यंत मराठवाड्यातील मतदारांनी कोणाला पसंती दिली हे समोर येणार. मराठवाड्यातील पाचही महानगरपालिकांसाठी अपेक्षेपेक्षा कमीच मतदान झाले. ज्येष्ठ नागरिकांसह नवख्या तरुण मतदारांनी मात्र यंदा स्वंयस्फूर्तीने मतदान केले. एकंदरीत मराठवाड्यातील प्रगतीचा आलेख लक्षात घेता मराठवाडा हा भाजपचा राहील, तसेच सर्वाधिक नगरसेवक हे भाजपचेच असतील असा अंदाज राजकीय विश्लेषकांनी मतदानाच्या दिवशी लावला. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी मतदानाच्या दिवशी चांगलीच चुरस दिसून आली. त्यापाठोपाठ नांदेड व लातूरची महानगरपालिका लक्षवेधी ठरणार. जालना येथे महानगरपालिकेसाठी पहिल्यांदाच मतदान पार पडले. जालन्यात मात्र मतदारांचा उत्साह दिसून आला. मराठवाड्यात काही किरकोळ प्रकार वगळता सर्वत्र शांततेत मतदान झाले. मतदानाची टक्केवारी अपेक्षेपेक्षा कमी असली तरी विजयाचा जल्लोष मात्र मराठवाड्यात मोठा होणार. राज्यातील २९ महानगरपालिकांमध्ये १५ जानेवारी रोजी मतदान पार पडले. निवडणुकीत मते मिळविण्यासाठी जवळपास सर्वच पक्षांनी जीव ओतून प्रचार केला व विजयासाठी दिवस-रात्र मेहनत घेतली. मराठवाड्यात अनेक पुढाऱ्यांनी निष्ठा वेशीवर टांगून विविध प्रकारची आश्वासने मतदारांना दिली. तरी देखील मतदारांचा उत्साह मराठवाड्यात अपेक्षित टक्केवारीपेक्षा कमीच दिसून आला. आश्वासने देऊन पूर्ण करणारा एकही पक्ष नाही, अशी प्रतिक्रिया अनेक मतदारांनी उघड उघड दिली; परंतु भाजपकडून आश्वासने पाळली जातील, असा मतदारांचा कयास आहे. केंद्र व राज्यातील सत्ताधाऱ्यांचे गणित लक्षात न घेणारे मतदार भूलथापांना बळी पडतात. भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, उद्धव बाळासाहेब ठाकरे गट, वंचित आघाडी, एमआयएम यासह इतर पक्षातर्फे जाहीरनामा प्रकाशित करताना आश्वासनांचा बाजार त्यामधून मांडला गेला. मते मिळविण्यासाठी राजकीय पुढाऱ्यांना काहीतरी आश्वासन द्यावेच लागते. यंदाची निवडणूक ही राज्यात यावेळी एका वेगळ्या स्वरूपात आलेली होती. पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या म्हणजेच २९ महानगरपालिकांसाठी एकाच दिवशी मतदान पार पडले. त्यामुळे पक्षांची व पक्षप्रमुखांची आश्वासने देताना तसेच प्रचारसभा घेण्यासाठी तारांबळ उडाली.

मराठवाड्यात ज्या-ज्या ठिकाणी महानगरपालिकांसाठी मतदान झाले, त्या-त्या ठिकाणी पक्षातर्फे विविध प्रश्न सोडविण्याचे आश्वासन दिले गेले. जी आश्वासने दिली जात आहेत, त्याकडे गांभीर्याने लक्ष दिले, तर हे सर्व प्रश्न आजपर्यंत कोणताही पक्ष का सोडवू शकला नाही, असा प्रश्न पडणे साहजिकच आहे. मतदानाच्या दिवशी अनेक मतदार हाच प्रश्न एकमेकांना उपस्थित करत होते. सत्तेवर असणारे कधीतरी विरोधी पक्षात होते व जे विरोधी पक्षात आहेत, ते कधीतरी सत्तेवर होतेच. मग हे दोन्ही पक्षांचे नेते व पक्ष केवळ मतदारांना गुलाबी आश्वासनेच देऊन मते मिळवित स्वतःची पोळी भाजून घेत होते का? आज जो सत्तेवर आहे, त्यांनी यापूर्वी विरोधी पक्षात असताना दिलेली आश्वासने व आजघडीला प्रलंबित असलेले प्रश्न याकडे लक्ष दिले, तर ते प्रश्न आजपर्यंत का सुटले नाहीत? गेल्या कित्येक वर्षांपासून मते मिळविण्यासाठी राजकीय मंडळी आश्वासनांचा धुरळा उडवतात हे लक्षात येईल. आजघडीला मराठवाड्यातील ज्या ५ महानगरपालिकांसाठी यंदा व यापूर्वी आश्वासने दिली गेली, त्यामध्ये सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे पाणी, रस्ते, ड्रेनेज व पथदिवे हे होत; परंतु या प्रश्नावर बोलण्यासाठी किंवा हे प्रश्न सुटले की नाही, यावर कोणीही बोलण्यास तयार नव्हते. यंदाच्या महानगरपालिका निवडणुकीत पक्ष नेत्यांच्या एकमेकांवरील वैयक्तिक टीकेने लक्ष वेधले गेले. मराठवाड्यात असलेल्या पाच महानगरपालिकांमध्ये सगळीकडे समस्या सारख्याच आहेत. आज बेरोजगारांची संख्या दुर्लक्षून चालणार नाही. नवनवीन उद्योग सुरू करण्यासाठी मोजकीच शहरे निवडली जातात. शिक्षणाच्या बाबतीत कोणतीही महानगरपालिका उच्च दर्जाचे शिक्षण देऊ शकत नाही. महिलांच्या प्रश्नांवर कोणतीही महानगरपालिका कार्य करत नाही. आजघडीला आवश्यक असलेल्या समस्या सोडविण्याच्या बाबतीत एकाही पक्षाच्या जाहीरनाम्यात त्याचा उल्लेख नव्हता. शेवटी कशाच्या बळावर ही राजकारणी मंडळी मते मागत असतील, असा प्रश्न सर्व सुजाण मतदारांना पडला होता. शोकांतिका म्हणजे आजही मते मागणारी मंडळी तसेच विविध पक्ष जवळपास एकाच प्रश्नांच्या भोवती फिरत होती.निवडणुकीत मते मिळविण्यासाठी मतदारांना आश्वासनरूपी प्रलोभने दाखविली गेली. मराठवाड्यातील जनतेने मतदान करताना केंद्रात व राज्यात सत्ताधाऱ्यांकडून मराठवाड्याचा विकास होऊ शकतो, हे मात्र लक्षात ठेवले. यासाठी उमेदवार, त्यांचा भाग, शहर, परिसरातील समस्या यावर जोर दिला गेला होता. भारत स्वतंत्र होऊन ७८ वर्षे झालेली आहेत. महाराष्ट्र गेल्या ७८ वर्षांपासून विविध निवडणुकीला सामोरे जातो. खरोखर जनतेचे प्रश्न सोडविण्यात हे पक्ष व पुढारी यशस्वी झाले असतील, तर त्यांना पुन्हा त्याच त्या मुद्द्यांवरून मतदारांच्या प्रश्नाला सामोरे जाण्याची वेळ आली नसती. आजही महानगरपालिकेची विकासकामांच्या बाबतीत जी अवस्था आहे, तशीच किंबहुना थोडी कमी-जास्त सर्वच महापालिकेची आहे व जवळपास तशाच समस्या मराठवाड्यातील पाचही महानगरपालिका हद्दीतही नक्कीच सापडतील. ज्या समस्या गेल्या ७०-७५ वर्षांपासून भेडसावत आहेत, त्या समस्या आजही कायम आहेत. मग हे राजकारणी व पुढारी शेवटी करतात तरी काय? दिलेली आश्वासने कोणताही पक्ष पूर्ण करत नाही, असेच या इतिहासात घडलेल्या अनेक गोष्टीवरून सांगता येईल. त्यामुळे सर्वच पक्षांनी महानगरपालिका निवडणुकीच्या निमित्ताने आश्वासनांचा बाजार मांडला होता, हे मात्र निश्चित. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, नांदेड, लातूर, परभणी व जालना या ठिकाणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विशेष लक्ष ठेवले. जाहीर सभांमधून मतदारांना अपेक्षित असलेले कार्य व भविष्याचे भाजपचे योगदान काय असणार आहे, हे सांगितल्यामुळे भाजपच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. मराठवाड्यातील महानगरपालिका कोणाकडे, केवळ मराठवाड्याचेच नव्हे तर संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. आज सायंकाळपर्यंत मराठवाडा कोणाचा? हे स्पष्ट होणार असले तरी भाजपची मात्र मुसंडी राहील, मराठवाड्यात भाजप हा सर्वाधिक नगरसेवक निवडून आणणारा पक्ष राहील, यात शंका नाही.

# विदर्भात तीन महापालिकांत भाजप नक्की!

विदर्भातील चार महानगरपालिकांच्या निवडणुकांचे चित्र आज मतमोजणीअंती स्पष्ट होत असून नागपूर, अमरावती, अकोला आणि चंद्रपूर या शहरांमध्ये राजकीय समीकरणे वेगवेगळी आकार घेताना दिसत आहेत. कुठे भाजप-शिवसेना युतीला घवघवीत यश, तर कुठे काँग्रेसची मुसंडी, अशा या निकालांनी विदर्भातील शहरी राजकारणाची दिशा ठरवणारा संकेत दिला आहे.

महाराष्ट्र महानगरपालिकांच्या निवडणुकांचे मतदान गुरुवारी पार पडले. विदर्भातील नागपूर, अमरावती, अकोला आणि चंद्रपूर या चार महानगरपालिकांमध्ये मतदान शांतपणे पार पडले. अर्थात मतदान म्हटले, की थोड्याफार घटना दुर्घटना असतातच तशा इथेही घडल्या आहेत. शुक्रवारी सकाळी चारही महानगरपालिकांमध्ये मतमोजणी सुरू झाली असून हे वार्तापत्र लिहीत असताना चारही महापालिकांचे कल हाती आले आहेत. ते कल बघता नागपुरात भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना शिंदे गट यांची एक हाती सत्ता येणार हे निश्चित झाले आहे. या दोघांनाही मिळून १५१ पैकी शंभरच्या वर जागा मिळतील हे स्पष्ट दिसते आहे. त्यामुळे २००७ पासून नागपुरात महापालिकेची भाजपची सत्ता सुरू झाली ती आजही कायम राहिली आहे, हे चित्र या क्षणी तरी दिसते आहे.

नागपूरमध्ये भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना शिंदे गट यांची युती झाली होती, तर राष्ट्रवादी काँग्रेस स्वतंत्रपणे लढली होती. आधी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट यांची युती होणार असे चित्र निर्माण झाले होते. मात्र शेवटपर्यंत हे दोघे एकत्र येऊ शकले नाहीत. शेवटी दोघांनीही आपापले उमेदवार मैदानात उतरवले आणि विरोधकांवर टीका करण्यापेक्षा एकमेकांवर टीका करण्यातच वेळ घालवला. त्यामुळे भाजप, शिवसेना युतीला मैदान आयतेच मोकळे मिळाले होते. हे सर्व निकाल बघता नागपुरात पुन्हा एकदा देवा भाऊच हे स्पष्ट झाले आहे. नागपुरात देवेंद्र फडणवीस यांच्यासह चंद्रशेखर बावनकुळे, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासह भाजपचे स्थानिक आमदार प्रवीण दटके, संदीप जोशी, विकास कुंभारे, मोहन मते तसेच शहर अध्यक्ष दया शंकर तिवारी, माजी आमदार अनिल सोले, प्रदेश कार्यकारिणीचे सदस्य संजय भेंडे, माजी आमदार गिरीश व्यास हे आणि इतर सर्वच पदाधिकाऱ्यांनी पूर्ण ताकद लावली होती. त्याचे परिणाम या निकालात दिसले आहेत. हे वार्तापत्र लिहीत असेपर्यंतची स्थिती अशी आहे, अमरावतीत मात्र भाजपची सत्ता येणे या क्षणी तरी कठीण दिसते. ८० पैकी ५७ जागांमध्ये भाजप २३ जागांवर विजयी झाली आहे किंवा आघाडीवर आहे, तर काँग्रेसने ३० पेक्षा अधिक जागा घेतल्या आहेत. शिवसेना शिंदे गटाला एक जागा मिळाली आहे, तर राष्ट्रवादी काँग्रेसला १० जागा मिळाल्या आहेत. या ठिकाणी सर्वच पक्ष स्वतंत्रपणे लढले होते. त्यामुळे मत विभाजन भरपूर झाल्याचे बोलले जात आहे. तरीही राज्यात सत्तेत एकत्र असलेले भाजप-शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र आले तर महायुतीची सत्ता बसू शकेल असे बोलले जात आहे. अर्थात अजून सर्व जागांचे निकाल आणि कल हाती यायचे आहेत. ते आल्यावर चित्र कदाचित वेगळे देखील राहू शकेल असे बोलले जात आहे. अकोल्यात मात्र भाजप-शिवसेना युतीने एकहाती यश मिळवले आहे. तिथे काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीला फारशा जागा मिळाल्या नाहीत. त्यामुळे अकोल्यात युतीची सत्ता येईल हे चित्र निश्चित आहे.

चंद्रपूरमध्ये मात्र भाजपची सत्ता येणे कठीण असल्याचे चित्र आहे. तिथे ६६ मतदारसंघांपैकी २३ जागांवर फक्त भाजपला विजय मिळू शकला आहे. शिवसेना शिंदे गटाला एक जागा मिळाली आहे. काँग्रेसने मात्र चांगलीच आघाडी घेतली आहे. त्यामुळे इथे मात्र भाजपची सत्ता येणे कठीण आहे. तसेही चंद्रपूर जिल्ह्यात भाजपमधील जुने दिग्गज नेते सुधीर मुनगंटीवार आणि काँग्रेसमधून उपरे आलेले किशोर जोरगेवार यांच्यात प्रचंड संघर्ष चालू होता. त्यामुळेच भाजपच्या हातून लोकसभेची जागा सहज निघून गेली होती. नगर परिषद निवडणुकांमध्येही भाजपला चांगलाच मार खावा लागला होता. आता देखील चंद्रपूर महानगरपालिका हातून जाईल हे अगदी निश्चित झाले आहे.

गुरुवारी मतदान होणार, त्याआधी मंगळवारी संध्याकाळी प्रचार थांबला तोवर या चारही महापालिकांमध्ये सर्वच पक्षांनी प्रचाराचा धुरळा उडवून दिला होता. मंगळवारी शेवटच्या दिवशी नागपुरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कितीतरी वर्षांनी स्वतः मोटरसायकल चालवत प्रचार रॅलीत सहभागी झाले होते. त्यांच्या या प्रचार रॅलीने एकूणच हवेत चांगलाच जोश भरला.

दिव्य वतन हे दैनिक वृत्तपत्र प्रकाशक मालक मुख्य संपादक गोपाल आनंदराव कडुकर यांनी कार्यालय हाऊस नंबर १८ निवास सोसायटी स्वामी समर्थ मंदिर जवळ घोगली रोड बेसा तालुका जिल्हा नागपूर - ४४००३४ येथून प्रकाशित केले. संपर्क मो. ७७०९३७७५१०

महत्त्वाचे...



### छत्रपती संभाजीनगरमध्ये भाजपच्या पराभूत उमेदवाराच्या घरावर दगडफेक

छत्रपती संभाजीनगरमध्ये महानगरपालिका निवडणुकीच्या मतमोजणीनंतर शहरात विजयी जल्लोष सुरू असतानाच गांधी नगर भागात राजकीय हिंसाचाराची धक्कादायक घटना घडली. भाजपचे उमेदवार बंटी चावरिया यांचा निवडणुकीत पराभव झाल्यानंतर त्यांच्या घरावर लाठ्या-काठ्यांनी सज्ज झालेल्या टोळक्याने जोरदार दगडफेक केल्याने परिसरात भीतीचे वातावरण पसरले. मिळालेल्या माहितीनुसार, शिंदे सेनेचे उमेदवार मिल्लू चावरिया हे देखील याच प्रभागातून निवडणूक लढवत होते. तुमच्यामुळेच माझा पराभव झाला, असा आरोप करत मिल्लू चावरिया यांच्या समर्थकांनी जुन्या वादातून आणि निवडणुकीतील पराभवाच्या संतापातून बंटी चावरिया यांच्या घराला लक्ष्य केल्याचे बोलले जात आहे.हा संपूर्ण हल्ला परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला असून, व्हिडिओमध्ये काही तरुण हातात लाठ्या-काठ्या घेऊन घराच्या दिशेने दगडफेक करताना स्पष्टपणे दिसत आहेत. या दगडफेकीत घराच्या खिडक्यांच्या काचा फुटल्या असून उभ्या वाहनांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

### ठाकरे बंधूंनी खूप चांगली लढत दिली:राज ठाकरेंच्या पत्नी शर्मिला यांचा दावा



मुंबई - मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या पत्नी शर्मिला ठाकरे यांनी महापालिका निवडणुकीत ठाकरे बंधूंनी अभिमानास्पद लढत दिल्याचा दावा केला आहे. ठाकरे बंधूंनी सगळीकडेच खूप चांगली लढत दिली. आम्हाला त्याचा अभिमान आहे. पण भाजपने अमाप पैसे ओतून व माणसे चोरून निवडणूक जिंकली, असे त्या म्हणाल्यात. आम्ही उद्यापासून पक्षबांधणीच्या कामाला लागणार असल्याचेही त्या यावेळी म्हणाल्या.मनसेच्या मुंबई विजयी उमेदवारांनी आज राज ठाकरे यांची भेट घेतली. यावेळी शर्मिला ठाकरे यांनी त्यांचे औक्षण केले. राज ठाकरे यांनी यावेळी त्यांच्याशी मनमोकळा संवाद साधला. यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना शर्मिला यांनी भाजप व शिंदे गटाचा विजय पैशाच्या जोरावर झाल्याचा आरोप केला. त्या म्हणाल्या, सत्ताधारी महायुतीने कल्याण डोंबिवली येथील आमच्या दिसतील त्या नेत्यांना व कार्यकर्त्यांना उचलून नेले. त्यानंतरही आमचे 5 उमेदवार तिथे निवडून आले. त्यांनी पैसे ओतले, माणसे चोरली, त्यानंतरही आम्ही नवी मुंबईत खाते उघडले. त्यामुळे मला अभिमान आहे. आमची अशीच घोडदौड सुरू राहील.त्या म्हणाल्या, सत्ताधारी महायुतीचे घटकपक्ष एकमेकांवरच आरोप - प्रत्यारोप करत आहेत. भाजपने पहिल्यांदा अजित पवारांच्या फायली आम्ही अजून बंद केल्या नसल्याचा इशारा दिला.

# जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका बॅलेट पेपरवर घ्या

## नाना पटोलेंचे राज्य निवडणूक आयुक्त व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना पत्र

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई - राज्यात नुकत्याच झालेल्या २९ महानगरपालिका निवडणुकांनी निवडणूक व्यवस्थेचा बुरखा पुर्णतः फाटलेला आहे. शहरातील अत्यल्प मतदानाची टक्केवारी ही केवळ मतदार उदासिन नसून निवडणूक प्रक्रियेवरचा जनतेचा विश्वास कमी होत असल्याचे निर्दशक आहे. देशातील अनेक राज्यांनी जनतेचा विश्वास टिकवण्यासाठी तसेच वाद टाळण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका EVM ऐवजी बॅलेट पेपरवर घेण्याचा निर्णय घेतलेला आहे. मग महाराष्ट्रातच EVM चा हट्ट का? व कोणाच्या फायद्यासाठी? असे प्रश्न मतदार विचारात आहेत. या जनभावनेचा आदर करत जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका बॅलेट पेपरवर घ्याव्यात, अशी मागणी काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष आमदार नाना पटोले यांनी केली आहे.

राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवलेल्या पत्रात नाना पटोले पुढे म्हणाले की, मतदार यादीतील घोळ, मतदान केंद्र शोधण्यासाठी मतदारांना दोन-तीन तास करावी लागणारी वणवण, हजारो मतदारांना मतदान न करताच परत जाण्याची येणारी वेळ, या साऱ्या बाबी निवडणूक आयोगाच्या अकार्यक्षमतेचे गंभीर निदर्शक आहेत, ही परिस्थिती लोकशाहीसाठी घातक आहे. अत्यंत गंभीर बाब म्हणजे पालिका निवडणुकीत VVPAT प्रणालीचा वापर करण्यात आला नाही, त्यामुळे आपल्या मतदानाची खात्री करण्याचा मतदाराचा अधिकारच हिरावून घेण्यात आला, त्यात भर म्हणजे मतदारांच्या बोटाला लावलेली शाई हात धुतल्यानंतर पुसली जात होती. या साऱ्या प्रकारामुळे निवडणूक प्रक्रियेतीला पारदर्शकता, विश्वासार्हता आणि आयोगाची निष्पक्षता यावर गंभीर प्रश्न चिन्ह उभे राहिले आहेत.

जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुका लोकशाहीच्या कणा आहेत, या निवडणुकीबाबत जर संशय, अविश्वास आणि गैरव्यवस्थेचे वातावरण राहिले तर ते लोकशाहीच्या आरोग्यावर गंभीर परिणाम करणारे आहे म्हणून जनभावनेचा विचार करून या निवडणुका EVM ऐवजी बॅलेट पेपरवर घ्याव्यात, असे नाना पटोले या पत्रात म्हणाले आहेत.





# भारतीय स्वतंत्रता स्मारक नामशेष करण्याचा प्रयत्न नेताजी जयंती राष्ट्रीय कार्यक्रमांना अडथळा

दिव्य वतन /वृत्तसेवा

बुलढाणा: भारतीय स्वतंत्रता स्मारक (अक्षय वटवृक्ष) अतिक्रमणाच्या विळख्यातून मुक्त करने, राष्ट्रीय कार्यक्रमात अडथळा निर्माण करणे, बुलढाणा शहरात महिलांसाठी शौचालय प्रसाधनगृह उभारणे यासह इतर इतर मागण्यांच्या पूर्ततेसाठी आझाद हिंद शेतकरी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष अँड.सतीशचंद्र रोठे पाटील यांनी लोटांगण आंदोलन करण्याचा इशारा 16 जानेवारीला दिलेल्या निवेदनातून जिल्हा प्रशासनाला दिला आहे. ज्यामुळे जिल्हा प्रशासन अलर्ट मोडवर आले आहे.शहीद क्रांतिकारकांच्या आणि भारतीय स्वातंत्र्याच्या स्मृती तेवत ठेवण्यासाठी तत्कालीन क्रांतिकारक आणि नगरपरिषद प्रशासनाने स्थानिक जयस्तंभ चौकामध्ये 15 आगस्ट 1947 ला भारतीय स्वतंत्रता स्मारक अक्षय वटवृक्ष लावून स्थापना केली होती. तत्कालीन मध्यप्रदेशचे विधानसभा उपसभापती आणि नगराध्यक्ष यांच्या हस्ते त्या ठिकाणी स्वतंत्र भारताचे प्रथम ध्वजारोहण करण्यात आले होते. तर त्यानंतर सदर स्मारक आणि अक्षय वटवृक्षाच्या संरक्षणार्थ 1986 मध्ये संरक्षणार्थ जाळी लावण्यात आली होती. त्यानंतर नगर परिषद बुलढाणा ने ठराव घेऊन साफसफाई आणि सौंदर्यीकरणासाठी आझाद हिंद संघटनेकडे देण्यात आलेले आहे.





शहीद क्रांतिकारकांच्या आणि स्वतंत्र्याच्या स्मृती येणाऱ्या पिढ्यांपर्यंत तेवत ठेवण्यासाठी आझाद हिंद च्या वतीने मागील 33 वर्षापासून या ठिकाणी नेताजी जयंती,प्रजासत्ताक दिन, स्वतंत्र दिन, क्रांती दिनाचे अचैत्य साधून स्मृति तेवत ठेवण्याचे कार्य अविरत सुरू ठेवले आहे. परंतु सद्यस्थितीत स्मारकाला लागून असलेले पेट्रोल पंप मालक यांनी सदर स्मारक नामशेष करण्याच्या हेतूने स्मारकाच्या चोही बाजूने अतिक्रमण केले आहे. तर स्मारकाच्या समोर गट्टू आणि गिट्टी,माती साहित्य जाणीवपूर्वक आणून ठेवले आहे. नेताजी जयंतीच्या अनुषंगाने 23 जानेवारीपासून स्मारकावर विविध कार्यक्रमांचे आयोजन आझाद हिंद च्या वतीने सलग ते 33 व्या वर्षी करण्यात आले आहे. परंतु अतिक्रमणामुळे नेताजी जयंतीच्या राष्ट्रीय कार्यक्रमाला अडथळा निर्माण होत आहे. करिता संबंधितावर कारवाई करीत भारतीय स्वतंत्रता स्मारक त्वरित अतिक्रमण मुक्त करावे, बुलढाणा शहरात महिलांसाठी प्रसाधन गृह, शौचालय उभारण्यात यावे यासह इतर मागण्यांसाठी आझाद हिंद च्या वतीने लोटांगण आंदोलन करण्याचा इशारा निवेदनातून दिला आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अमरावती आयुक्त, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, नगर विकास विभागाचे उपआयुक्त, मुख्याधिकारी आदींना सदर निवेदन देत 48 तासात मागण्यांची पूर्तता करावी अन्यथा आंदोलनाची माहिती देण्यात आलेली आहे.

**आता पुढील निवडणुका बॅलेट पेपरवरच घ्या**

# पुणे-पिंपरीत 'पानिपत' झाल्यानंतर राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरींची मागणी

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई- राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निकालात भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना (शिंदे गट) महायुतीने दणदणीत विजय मिळवला असून, अजित पवारांच्या राष्ट्रवादीला पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये मोठ्या पराभवाचा धक्का बसला आहे. या 'पानिपत'नंतर राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी यांनी आक्रमक पवित्रा घेत आगामी सर्व निवडणुका 'बॅलेट पेपर'वर घेण्याची मागणी केली आहे. सरकार आणि निवडणूक आयोगाला जनतेचा विश्वास कायम ठेवायचा असेल, तर ईव्हीएमऐवजी बॅलेट पेपरचा पर्याय स्वीकारावा लागेल, असे मत मिटकरी यांनी व्यक्त केले.

राज्यातील २९ महानगरपालिका निवडणुकांचे निकाल काल जाहीर झाले. या निकालांत भाजपला सर्वाधिक यश मिळाले. तर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला केवळ अहिल्यानगरमध्ये चांगले



यश प्राप्त झाले. मात्र, त्यांचाच बालेकिल्ला असलेल्या पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये मोठ्या पराभवाचा सामना करावा लागला. या पराभवानंतर राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी यांनी राज्यातील यापुढील सर्व निवडणुका बॅलेट पेपरवर घेण्याची मागणी करत, विरोधकांच्या सुरात सूर मिसळला आहे. सत्ताधारी पक्षाच्या आमदाराच्या या मागणीमुळे आता राजकीय वर्तुळात पुन्हा एकदा ईव्हीएमवरून वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे.

पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील पराभवावर आश्चर्य व्यक्त करताना मिटकरी म्हणाले, "दोन्ही शहरांत प्रचंड काम करूनही आमचा पराभव कसा होऊ शकतो? ईव्हीएमचा फायदा काही ठराविक पक्षांनाच कसा होतो, हा मोठा प्रश्न आहे. सरकार आणि निवडणूक आयोगाला जनतेचा विश्वास टिकवून ठेवायचा असेल, तर बॅलेट पेपरवर मतदान घेण्याचा निर्णय घ्यावाच लागेल."

दोन्ही राष्ट्रवादीच्या नेत्यांमध्ये झालेल्या बैठकीवर बोलताना अमोल मिटकरी म्हणाले की, "ही बैठक दैनंदिन प्रक्रियेचा भाग होती. कुटुंब म्हणून पवार कुटुंब नेहमीच एक आहे, मात्र राजकीय एकत्रिकरणाचा निर्णय हा ज्येष्ठ नेते शरद पवार आणि अजित पवार हेच घेतील."

शुक्रवारी (१६ जानेवारी) जाहीर झालेल्या महानगरपालिकांच्या निकालात भाजपने ऐतिहासिक कामगिरी केली आहे. एकूण २९ पैकी २४ महापालिकांवर भाजप-शिंदेसेना युतीने वर्चस्व मिळवले असून, ९ ठिकाणी भाजपने स्वबळावर सत्ता स्थापनेचा आकडा गाठला आहे.

# पाणी विषारी, हवा विषारी, औषध विषारी, जमीन विषारी -राहुल गांधी

दिव्य वतन /वृत्तसेवा

नवी दिल्ली : भाजपच्या डबल इंजिन सरकारचे नवीन स्मार्ट सिटी मॉडेल म्हणजे पाण्यात विष, हवेत विष, औषधात विष, जमिनीत विष, आणि जर तुम्ही जाब विचारला तर बुलडोझर वापरला जाईल! या मॉडेलमध्ये, गरिबांच्या मृत्यूसाठी कोणीही जबाबदार नाही. सरकारने त्यांच्या निष्काळजीपणामुळे झालेल्या इंदूर दुर्घटनेची जबाबदारी घ्यावी - दोषींना शिक्षा करावी आणि पीडितांना लवकरात लवकर चांगले उपचार आणि भरपाई द्यावी.लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी शनिवारी इंदूरला पोहोचले. त्यांनी दूषित



पाणी पिऊन आजारी पडलेल्या रुग्णांची आणि मृतांच्या कुटुंबियांची भेट घेतली. राहुल प्रथम बॉम्बे रुग्णालयात गेले, जिथे त्यांनी दूषित पाण्यामुळे त्रस्त रुग्णांची आणि कुटुंबियांची भेट घेतली.मृतांच्या कुटुंबीयांना भेटल्यानंतर राहुल गांधी म्हणाले की, ही नवीन मॉडेलची स्मार्ट सिटी आहे. पिण्याचे पाणी नाही. कुटुंबे पाणी प्यायल्यानंतर आजारी पडली. म्हणजे इंदूरमध्ये स्वच्छ पाणी मिळू शकत नाही. हे आहे अर्बन मॉडेल. सरकार आपली जबाबदारी पार पाडत नाहीये.यापूर्वी राहुल गांधी भागीरथपुरा येथे पोहोचले आणि दूषित पाण्यामुळे जीव गमावलेल्या गीताबाई आणि जीवनलाल यांच्या कुटुंबांना भेटले. दोन्ही कुटुंबांना त्यांनी प्रत्येकी एक लाख रुपयांचा चेक दिला. यानंतर राहुल गांधी संस्कार गार्डन येथे पोहोचले. येथे त्यांनी इतर बाधित कुटुंबीयांची भेट घेतली. सर्वांना दीड-दीड लाख रुपयांचा चेकही सुपूर्द केला.राहुल गांधींसोबत माजी मुख्यमंत्री दिग्विजय सिंह, प्रदेश प्रभारी हरीश चौधरी, प्रदेश काँग्रेस अध्यक्ष जीतू पटवारी, विरोधी पक्षनेते उमंग सिंघार आणि अजय सिंह हे देखील उपस्थित होते.

# गडकरी म्हणाले- माझ्या शहरात शौचालयाचे पाणी विकतो

## त्या पाण्यातून 300 कोटी रुपये मिळतात, आता कचरा विकू लागलो आहे

दिव्य वतन /वृत्तसेवा

विदिशा- केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री गडकरी म्हणाले, मी माझ्या शहरात शौचालयाचे पाणी विकतो. यातून 300 कोटी रुपये मिळतात. आता कचरा विकायला लागलो आहे. मी विद्यार्थी नेता होतो. गावात भिंतींवर लिहिण्याचे काम करत असे. दिल्ली-मुंबईची माहिती नव्हती. तेव्हा योग्य नेते भेटले, मार्गदर्शन मिळाले. जेव्हा चांगले नेते मिळतात, तेव्हा बदलही योग्य दिशेने होतो.

केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी आणि केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान शनिवारी मध्य प्रदेशातील विदिशा येथे




आहेत. त्यांनी येथे रोड शो केला. गडकरी आणि शिवराज यांच्यासोबत मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव देखील उपस्थित आहेत.

विदिशा येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात मुख्य समारंभ आयोजित करण्यात आला आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सुमारे 181 किलोमीटर लांबीच्या 8 रस्ते प्रकल्पांचे लोकार्पण आणि भूमिपूजन केले. शहराला 4400 कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या रस्ते प्रकल्पांची आणि ड्रायव्हिंग प्रशिक्षण केंद्रांची भेटही दिली.

केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान म्हणाले, मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव विदिशामध्ये मोठ्या-मोठ्या घोषणा करून गेले. पण आतल्या छोट्या गल्लीतील रस्त्यातही खड्डा झाला तर लोक आजही मामासोबत खड्ड्याचा फोटो लावतात. आता गल्लीतील रस्त्यासाठी केंद्रीय मंत्री काय करणार?

मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव म्हणाले, काम करणाऱ्यांसोबत जनता असते. जो काम करतो तो राज्य करतो. गडकरीजी, तुम्हाला अजून उज्जैनच्या विकासकामांसाठीही यावे लागेल. फक्त विदिशासाठी तुम्हाला सोडणार नाही

# महाराष्ट्रामध्ये शिवसेना - NCP ची मते आता भाजपची:ठाकरे मुंबईपुरतेच मर्यादित राहिले, शिंदेंकडे ठाणे, फक्त भाजप 'ऑल स्टेट' पार्टी

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई, नवी मुंबई, पुणे, नागपूर, ठाणे, पिंपरी चिंचवड आणि नाशिक, महाराष्ट्रातील बहुतेक मोठ्या महानगरपालिका आता भाजपच्या ताब्यात आहेत. महानगरपालिका निवडणुकीत भाजपने एकतर्फी विजय मिळवला, पण या निकालाचे आणखीही काही अर्थ आहेत. मराठी माणसाचे राजकारण करणारे उद्धव आणि राज ठाकरे मुंबईपुरतेच मर्यादित राहिले. एकनाथ शिंदे फक्त ठाणे जिंकू शकले. भाजपची साथ सोडून काका शरद पवारांसोबत निवडणूक लढलेले अजित पवार सर्वात मोठे पराभूत ठरले. काँग्रेस लातूर आणि चंद्रपूर वगळता इतर सर्व ठिकाणी हरली.

आता फक्त भाजपच संपूर्ण महाराष्ट्राचा पक्ष आहे. निकाल दर्शवतो की शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर विभागलेली मते आता भाजपच्या दिशेने वळली आहेत. असे कसे झाले, महानगरपालिका निवडणुकीच्या निकालाचे काय अर्थ आहेत, हे समजून घेण्यासाठी आम्ही भाजप नेत्यांव्यतिरिक्त महाराष्ट्राच्या राजकारणाचे जाणकार असलेल्या तज्ञांशी बोललो.

याचे उत्तर महाराष्ट्र भाजपचे एक ज्येष्ठ नेते देतात. ते म्हणतात, 'हा विजय आज जरी मिळाला असला तरी, त्याची तयारी 6 वर्षांपूर्वीच सुरू झाली होती. 24 ऑक्टोबर 2019 रोजी महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीचे निकाल आले होते. भाजप 105 जागा जिंकून सर्वात मोठा पक्ष ठरला. सहयोगी शिवसेनेला 56 जागा मिळाल्या.'

'भाजप देवेंद्र फडणवीस यांना मुख्यमंत्री बनवणार होती, तेव्हाच शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे अडले. त्यांनी मुख्यमंत्री होण्यासाठी युती तोडली. पहिल्यांदा काँग्रेससोबत युती केली आणि 28 नोव्हेंबरला मुख्यमंत्री झाले. तेव्हाच ठरले होते की शिवसेनेला तोडायचे आहे. महाराष्ट्रामध्ये भाजपला स्वतःच्या बळावर उभा पक्ष बनवायचे आहे. आज जे निकाल आले आहेत, ते याच योजनेचा भाग होते.'

यावर आम्ही भाजपमधील आमच्या सूत्रांशी बोललो. ते सांगतात की, आमचं पहिलं लक्ष्य होतं - एकनाथ शिंदे यांच्यामार्फत शिवसेनेला तोडून कमकुवत करणे. त्यानंतर शिंदे यांनाही मजबूत होऊ न देणे. दुसरं लक्ष्य होतं - अजित पवार यांच्यामार्फत शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस तोडणे, आणि मग तुटलेल्या पक्षाला समोरासमोरच्या लढाईत हरवणे.




6 वर्षे या योजनेवर काम सुरू राहिले आणि भाजपने आधी विधानसभा आणि आता नगरपरिषद निवडणुकीत आपली अंतिम चाल खेळली. महाराष्ट्रातील दोन मोठे पक्ष शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस एका मर्यादित अडकले. महाराष्ट्रातील 29 नगरपरिषदांपैकी 23 भाजपने जिंकल्या. महाराष्ट्राच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पक्षाला इतका मोठा विजय मिळण्याची ही पहिलीच वेळ आहे.

## फॅशन...

### सागर कारंडेशी भांडण करून Biggg Bossचं घर गाजवणाऱ्या तन्वी कोलतेचा लालभडक साडीतील लूक पाहिलात का?



बिग बॉस मराठी 6'चं घर सध्या सतत चर्चेत आहे. कधी टास्कदरम्यान होणारे वाद, कधी स्पर्धकांमधील मतभेद, तर कधी भावनिक प्रसंग प्रेक्षकांचं लक्ष वेधून घेत आहेत. या सगळ्या घडामोडींमध्ये एक नाव सातत्याने चर्चेत राहिलं आहे, ते म्हणजे तन्वी कोलते. सागर कारंडेसोबत झालेल्या वादामुळे ती चर्चेचा केंद्रबिंदू ठरली असली, तरी तिची ओळख केवळ वादांपुरती मर्यादित राहिलेली नाही. तिचा आत्मविश्वास, ठाम भूमिका आणि स्टायलिश अंदाज यामुळे ती सोशल मीडियावरही चर्चेचा विषय बनली आहे. अलीकडेच समोर आलेल्या फोटोंमध्ये तन्वी लाल रंगाच्या शिफॉन साडीत दिसून येते. साडीला असलेली नाजूक सोनेरी काठ तिच्या लूकला वेगळाच उठाव देते.पाहूया तिचा हा लूक या लूकमध्ये तन्वी कोलतेने लाल रंगाची शिफॉन साडी परिधान केली असून साडीला नाजूक सोनेरी काठ देण्यात आली आहे. हलकं, प्रवाही फॅब्रिक आणि साधी पण एलिगंट डिझाईन यामुळे तिचा लूक अधिक आकर्षक दिसतो. साडीवर असलेले छोटे सोनेरी बुट्टे संपूर्ण अवताराला क्लासी टच देतात. मेकअपच्या बाबतीत तिने सॉफ्ट आणि नैसर्गिक लूक पसंत केला आहे. हलकासा ग्लो, आयमेकअप आणि न्यूड शेड लिपस्टिक यामुळे तिचं सौंदर्य अधिक खुलून दिसतं.

लूक पूर्ण करण्यासाठी मेकअप

या लाल शिफॉन साडीच्या लूकला परिपूर्ण करण्यासाठी तन्वीने अतिशय सॉफ्ट आणि एलिगंट मेकअप निवडला आहे. बेस मेकअपमध्ये नैसर्गिक ग्लोवर भर देण्यात आला असून त्वचा उजळ दिसते. डोळ्यांसाठी हलकासा आयशॅडो, नीटस आयलाइनर आणि मस्कारा वापरण्यात आला आहे, ज्यामुळे नजर अधिक उठावदार दिसते.

दागिन्यांनी पुर्ण केला लुक

दागिन्यांची निवडही अगदी मोजकी आहे. गोल्डन इअररिंग्स आणि हातातील मॅचिंग बांगड्या यामुळे पारंपरिक लूकला योग्य असा फिनिश मिळतो.साधेपणा,ग्रेस आणि आत्मविश्वास यांचा सुंदर संगम म्हणजे तन्वी कोलतेचा हा लाल साडीतील लूक म्हणावा लागेल.

असा होती हेअरस्टाईल

या लूकमध्ये तन्वीने केस साध्या पण अत्यंत एलिगंट पद्धतीने साकारले आहेत. मधल्या भांगातून नीट सेट केलेले मोकळे केस तिच्या चेहऱ्याच्या आकाराला सुंदररीत्या फ्रेम देतात. केसांमध्ये हलका व्हॉल्युम ठेवण्यात आल्यामुळे लूक अधिक ग्रेसफुल दिसतो.समोरच्या बाजूचे केस सौम्यपणे मागे सेट केले असून उर्वरित केस खांद्यावर मोकळे सोडले आहेत. ही हेअरस्टाईल अतिशय नॅचरल आहे.

चाहत्यांच्या कमेंट्स

तन्वी कोलतेच्या या लाल साडीतील लूकवर सोशल मीडियावर चाहत्यांकडून भरभरून प्रतिक्रिया येत आहेत. अनेकांनी तिच्या सौंदर्याचं आणि एलिगंट स्टाईलचं मनापासून कौतुक केलं आहे."लाल साडीत खूपच सुंदर दिसतेस","Simple but classy look","Bigg Boss घरातली सर्वात graceful स्पर्धक" तन्वीचा हा लूक प्रेक्षकांच्या पसंतीस उतरलेला दिसतो.

### 45 वर्षीय श्वेता तिवारीचा दिलखेच अंदाज,स्लिट स्कर्टमध्ये घातला धुमाकूळ



अभिनयात आपली वेगळी ओळख निर्माण करणारी अभिनेत्री श्वेता तिवारी पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. यावेळी कारण ठरले आहे तिचा नुकताच व्हायरल झालेला पिंक हाय-स्लिट स्कर्टमधील एलिगंट लूक. 45 व्या वर्षीही श्वेताने आपल्या फॅशन सेन्सने आणि आत्मविश्वासाने वय ही केवळ एक संख्या आहे, हे पुन्हा सिद्ध करून दाखवले आहे.सोशल मीडियावर तिचे हे फोटो मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून चाहत्यांकडून तिला भरभरून कौतुक मिळत आहे. या लूकमध्ये श्वेताचा आत्मविश्वास विशेष लक्ष वेधून घेतो. कॅमेऱ्यासमोर तिच्या पोझ, एक्सप्रेशन्स आणि बॉडी लँग्वेजमधून तिचा अनुभव आणि कम्फर्ट स्पष्टपणे जाणवतो. पिंक रंगाचा हा हाय-स्लिट स्कर्ट आणि त्यासोबत मॅचिंग टॉप तिच्या व्यक्तिमत्त्वाला ग्लॅमरस टच देतो तर संपूर्ण लूकमध्ये एक एलिगन्सही दिसून येते. हा लूक केवळ एका फोटोशूटपुरता मर्यादित नाही. आजच्या काळात अनेक महिला वय, शरीरयष्टी किंवा समाजाच्या अपेक्षांमुळे फॅशनबाबत संकोच करतात.अशा वेळी श्वेता तिवारीसारखी अभिनेत्री खुलेपणाने, आत्मविश्वासाने स्वतःला सादर करते, तेव्हा ती इतर महिलांसाठी प्रेरणादायी ठरते. योग्य फिटिंग, योग्य रंग आणि स्वतःवरचा विश्वास असेल, तर कोणताही लूक सुंदर दिसू शकतो. या फोटोशूटमध्ये श्वेता तिवारीने परिधान केलेला पिंक रंगाचा हाय स्लिट स्कर्ट आणि मॅचिंग टॉप हा लूक अतिशय रॉयल आणि क्लासी वाटतो. स्कर्टवरील नाजूक डिझाइन, पर्ल वर्क आणि स्लिट कटमुळे तिच्या व्यक्तिमत्त्वात ग्लॅमरची भर पडली आहे. हा लूक एकाच वेळी बोल्ड आणि एलिगंट आहे, जो आजच्या आधुनिक महिलांसाठी नक्कीच स्टाईल इन्स्पिरेशन ठरू शकतो. श्वेता तिवारीच्या या लूकमधील सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे तिचा आत्मविश्वास.वयाच्या कोणत्याही टप्प्यावर स्वतःला कसे सादर करायचे, याचे उत्तम उदाहरण तिने दिले आहे. कॅमेऱ्यासमोर तिची देहबोली, पोझ आणि एक्सप्रेशन्स पाहता ती किती कम्फर्टेबल आणि कॉन्फिडंट आहे, हे स्पष्टपणे दिसते. त्यामुळेच तिचे फोटो केवळ फॅशनसाठी नाही, तर 'सेल्फ-लव्ह' आणि 'सेल्फ-ॲक्सेप्टन्स'चा संदेशही देतात.

# बॉलिवूडमध्ये AR रहमानला काम मिळत नाहीये:कारण सांप्रदायिक अँगल? जावेद अख्तर नाकारत म्हणाले- निर्माते संपर्क साधण्यास कचरतात

ऑस्कर विजेते संगीत दिग्दर्शक एआर रहमान यांनी हिंदी चित्रपटसृष्टीत काम न मिळण्याचं कारण सांप्रदायिक दृष्टिकोन आणि बदलत्या सत्ता समीकरणांना दिलं आहे. अलीकडेच एका मुलाखतीदरम्यान एआर रहमान यांनी सांगितलं की त्यांना 8 वर्षांपासून बॉलिवूडमध्ये काम मिळणं बंद झालं आहे.

बॉलिवूडमध्ये रहमान यांना काम न मिळण्याबाबतच्या त्यांच्या विधानामुळे सोशल मीडियापासून ते बॉलिवूडच्या गल्लीबोळात एक नवीन वाद सुरू झाला आहे. आता या मुद्द्यावर गीतकार, पटकथा-संवाद लेखक जावेद अख्तर यांनी आपलं मत मांडलं आहे.

जावेद अख्तर यांनी रहमान यांचा दावा पूर्णपणे फेटाळून लावला. आयएएनएसशी बोलताना ते म्हणाले, "मला असं कधीच वाटलं नाही. मी मुंबईत राहतो, सगळ्यांना भेटतो. रहमानला खूप आदर मिळतो." जावेद अख्तर यांचे मत आहे की रहमान पश्चिमेकडे (वेस्टमध्ये) व्यस्त असतात, शो करतात, त्यामुळे निर्माते त्यांच्याशी संपर्क साधायला कचरतात. ते म्हणाले, "ऑस्कर विजेत्यासारख्या



महान व्यक्तिमत्त्वाजवळ छोटे निर्माते संकोच करत असतील. यात कोणताही सांप्रदायिक कोन नाही.

खरं तर, बीबीसी एशियन नेटवर्कला दिलेल्या मुलाखतीत एआर रहमान यांनी सांगितले की, बॉलिवूडमधील संगीताचे नियंत्रण आता म्युझिक लेबल्स आणि कॉर्पोरेट्सच्या हातात गेले आहे. आधी दिग्दर्शक आणि संगीतकार एकत्र काम करत होते, पण आता कंपन्या पाच संगीतकारांना एकत्र ठेवतात.

रहमान म्हणाले, "मी कामाच्या शोधात नाही. काम माझ्याकडे स्वतःहून यावे, माझ्या प्रामाणिकपणातून मिळावे." त्यांनी स्पष्ट केले की ही मंदी त्यांच्या आत्मसन्मानावर परिणाम करत



नाही. रहमान यांनी जातीयवादी दृष्टिकोनावरही थेट भाष्य केले. जरी त्यांनी सांगितले आहे की त्यांच्यासमोर कोणीही असे बोलले नाही, तरी काही कुजबुज ऐकू येते.

सांगायचं म्हणजे, रहमानचा बॉलिवूड प्रवास 1992 च्या 'रोजा' चित्रपटापासून सुरू झाला, जो मूळ तमिळ चित्रपटाची हिंदी डबिंग होती. त्यानंतर त्यांनी रंगीला, बॉम्बे, दिल से, ताल, लगान, साथिया, स्वदेश, रंग दे बसंती, जोधा-अकबर, गजनी, रॉकस्टार, रांझणा, मैदान आणि छावा यांसारख्या अनेक बॉलिवूडच्या सुपरहिट चित्रपटांना संगीत दिले आहे. सध्या ते नितेश तिवारी यांच्या 'रामायण' चित्रपटासाठी संगीत देत आहेत.

## मुंबई उच्च न्यायालयात आनंद एल. राय यांच्या विरोधात खटला दाखल

### इरॉस इंटरनॅशनलने ₹84 कोटींच्या नुकसान भरपाईची मागणी केली

बॉलिवूडमध्ये कॉपीराइट वादाने जोर पकडला आहे. इरॉस इंटरनॅशनल मीडिया लिमिटेडने मुंबई उच्च न्यायालयात चित्रपट निर्माता आनंद एल. राय आणि त्यांची प्रोडक्शन कंपनी कलर यलो मीडिया एंटरटेनमेंट एलएलपी यांच्या विरोधात खटला दाखल केला आहे.

टाइम्स ऑफ इंडियामध्ये प्रसिद्ध झालेल्या वृत्तानुसार, इरॉसचा आरोप आहे की आनंद राय यांच्या नवीन चित्रपट 'तेरे इश्क में' (2025) ला जाणूनबुजून 2013 च्या हिट चित्रपट 'रांझणा' चा 'स्पिरिचुअल सीक्वल' म्हणून प्रचारित केले गेले, ज्यामुळे त्यांच्या सद्भावनेचा (गुडविलचा) अवैध फायदा घेतला गेला. कंपनी ₹84 कोटींच्या नुकसान भरपाईची मागणी करत आहे.

हे प्रकरण व्यावसायिक आयपी खटला आणि अंतरिम अर्जावर आधारित आहे, ज्यात ट्रेडमार्क उल्लंघन, कॉपीराइट उल्लंघन आणि पासिंग ऑफचे आरोप लावण्यात आले आहेत. इरोसच्या वकिलांचे म्हणणे आहे की, 'रांझणा'ची कथा, पात्रे आणि थीम्स 'तेरे इश्क में' मध्ये कॉपी करण्यात आल्या आहेत.

चित्रपटाच्या प्रोमो, ट्रेलर आणि मार्केटिंगमध्ये 'रांझणा'चा उल्लेख वारंवार करण्यात आला, कोणत्याही परवानगीशिवाय. इरोसचा दावा आहे की 'रांझणा'ने 100 कोटी रुपयांपेक्षा जास्त कमाई केली होती आणि ही त्यांची प्रमुख मालमत्ता आहे.

'रांझणा' हा आनंद एल. राय यांनीच दिग्दर्शित केलेला चित्रपट होता, ज्यात धनुष, सोनम कपूर आणि अभय देओल



मुख्य भूमिकेत होते. हा बनारसच्या पार्श्वभूमीवर आधारित एक रोमँटिक ड्रामा होता, जो एकतर्फी प्रेमकथेवर आधारित होता. इरोसने याचे प्रोडक्शन (निर्मिती) आणि डिस्ट्रीब्यूशन (वितरण) केले होते. तर, 'तेरे इश्क में' आनंद राय यांच्या बॅनर कलर यलो मीडिया एंटरटेनमेंट एलएलपी अंतर्गत बनला आहे.


न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेनुसार, आनंद राय यांनी 'रांझणा'च्या ट्रेडमार्क केलेल्या शीर्षक, टॅगलाइन आणि व्हिज्युअल घटकांचा वापर केला. उदाहरणार्थ, प्रमोशनल मटेरियलमध्ये 'रांझणा' सारखे ठिकाण, संगीत शैली आणि भावनिक टोन दाखवण्यात आला. इरॉसने पुरावा म्हणून पोस्टर्स, टीझर आणि मुलाखतींच्या क्लिप्स सादर केल्या आहेत.

इरॉसच्या सीईओने आपल्या निवेदनात म्हटले आहे की, आमच्या मालमत्तेचे संरक्षण करणे हा आमचा हक्क आहे. ही स्पष्ट चोरी आहे. मात्र, या प्रकरणी आनंद राय यांच्याकडून अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. न्यायालयाने पुढील सुनावणी 20 जानेवारी रोजी निश्चित केली आहे.

## 2016 ची आठवण करून कंगना रणौत म्हणाली यश विषारी अन् आयुष्य नरक झाले होते, सर्व नाटक निरुपयोगी ठरेल, माहित असते तर दु:खी झाले नसते

सोशल मीडिया ट्रेंड्समध्ये अभिनेत्री-राजकारणी कंगना रणौत कधीच मागे राहत नाही. यावेळी तिने २०१६ च्या वाईट आठवणींना उजाळा देत एक मजेदार वळण दिले आहे. इंस्टाग्रामवर शेअर केलेल्या व्हिडिओ आणि कॅप्शनमध्ये कंगनाने हृतिक रोशनसोबतच्या कायदेशीर लढाईच्या जुन्या गोष्टी आठवल्या, पण २०२६ च्या आनंदी आयुष्याशी जोडून सांगितले की तो काळ आता निरर्थक झाला आहे.

कंगनाने लिहिले, "अचानक सगळ्यांना 2016 ची आठवण का येत आहे? माझ्या करिअरची गती सुरुवातीपासून शेवटपर्यंत वाढतच राहिली. 'क्वीन' आणि 'तनु वेड्स मनु रिटर्न्स' सारख्या ब्लॉकबस्टर हिट्सनंतर मी सर्वाधिक मानधन घेणारी अभिनेत्री बनले होते. पण जानेवारी 2016 मध्ये एका सहकाऱ्याने वादग्रस्त कायदेशीर नोटीस पाठवली, ज्यामुळे इंडस्ट्री



हादरली."

त्यांनी पुढे लिहिले, "यश विष बनले, आयुष्य नरक झाले. लोक गटांमध्ये विभागले गेले, कायदेशीर लढाया सुरू झाल्या. दहा वर्षांपूर्वी जर मला माहीत असते की 2026 मध्ये मी प्रत्येक जेवणात कार्बोहायड्रेट खात आहे, खूप हसत आहे आणि 2016 चे सर्व नाटक निरुपयोगी ठरणार आहे, तर मी इतकी दुःखी झाले नसते. देवाचे आभार, आपण 2026 मध्ये आहोत!"2016 हे कंगनासाठी खरंच एक नासूर होतं. तिने हृतिक रोशनसोबतच्या नात्याची सत्यता उघड केली, त्याला 'माजी वेडा प्रियकर' म्हटले आणि एका मोठ्या चित्रपट निर्मात्याच्या मुलाने फसवल्याचा आरोप केला. हृतिकने नोटीस पाठवून माफी मागितली, पण प्रकरण अधिक गुंतागुंतीचे होत गेले. कंगनाने हृतिक आणि त्याच्या वडिलांवर जीवे मारण्याची धमकी दिल्याचाही आरोप केला. मीडिया ट्रायल आणि कायदेशीर संघर्ष सुरू राहिला, पण वेळेने सर्व काही दाबून टाकले. आज कंगनाचे हसू हाच तिचा सर्वात मोठा विजय आहे.



## हिजाब घालण्यावर सना खान म्हणाली:कोणीही माझे ब्रेनवॉश केले नाही, माझे पती अनसने मला योग्य मार्ग दाखवला



माजी अभिनेत्री सना खान नुकतीच अभिनेत्री रश्मी देसाईच्या यूट्यूब चॅनलवर तिचे पती मुफ्ती अनस सय्यद यांच्यासोबत दिसली. या संवादात सनाने तिच्या लग्नाबद्दल, बॉलिवूड सोडण्याच्या निर्णयाबद्दल आणि त्या अफवांबद्दल मोकळेपणाने सांगितले, ज्यांमध्ये असे म्हटले जात होते की तिला इंडस्ट्री सोडण्यासाठी 'ब्रेनवॉश' केले गेले होते.

सना खानने सांगितले की तिचे लग्न अत्यंत खाजगी आणि 'टॉप सीक्रेट' पद्धतीने झाले होते. ती म्हणाली की जेव्हा तिचे लग्न ठरले, तेव्हा तिच्या आई-वडिलांशिवाय कोणालाही नवरदेवाचे नाव माहीत नव्हते. इतकेच काय, मेहंदी आर्टिस्टने जेव्हा नवरदेवाचे नाव विचारले, तेव्हा तिने सांगण्यास नकार दिला.

सना म्हणाली की ती त्यावेळी तिच्या आयुष्यातील एका मोठ्या बदलातून जात होती आणि स्वतःला पूर्णपणे बदलत होती. हा निर्णय तिचा स्वतःचा होता आणि या मार्गावर तिला तिचे पती अनस यांनी योग्य दिशा दाखवली.

बॉलिवूड सोडण्याबाबत आणि हिजाब घालण्याबाबत उपस्थित झालेल्या प्रश्नांवर सनाने स्पष्टपणे सांगितले की, कोणाचेही जबरदस्तीने ब्रेनवॉश करता येत नाही.ती म्हणाली- "लोकांना वाटते की मी आधी हिजाबशिवाय राहायचे आणि अचानक सर्व काही बदलले, तर नक्कीच कोणीतरी माझे ब्रेनवॉश केले असेल. पण तसे नाही. जोपर्यंत तुम्हाला स्वतःला बदलायचे नाही, तोपर्यंत कोणीही तुम्हाला बदलू शकत नाही. मला शांतता हवी होती. माणसाला प्रसिद्धी, पैसा आणि प्रतिष्ठा मिळू शकते, पण शेवटी प्रत्येकाला शांतीच हवी असते."सनाने असेही सांगितले की, तिने चित्रपटसृष्टी सोडली कारण जेव्हा तुमचे वातावरण योग्य नसते, तेव्हा तुमचे निर्णयही अनेकदा चुकीचे होतात. आज ती तिच्या पतीसोबतच्या नात्याला सर्वाधिक महत्त्व देते.

## डॉन-3 मध्ये शाहरुख खान परत येणार:फरहान अख्तरसमोर अभिनेत्याने अट ठेवली; आधी रणवीर सिंग मुख्य भूमिका साकारणार होता

फरहान अख्तर दिग्दर्शित 'डॉन-3' हा चित्रपट पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. नवीन वृत्तानुसार, या आयकॉनिक फ्रँचायझीमध्ये शाहरुख खान परत येऊ शकतो. फरहान अख्तर आणि किंग खान यांच्यात चित्रपटाबाबत पुन्हा चर्चा सुरू झाल्याचे सांगितले जात आहे.

टेली चक्करच्या वृत्तानुसार, शाहरुख खानने चित्रपटात परत येण्याचे संकेत दिले आहेत, पण एका खास अटीवर. अभिनेत्याची इच्छा आहे की 'डॉन-3' चे दिग्दर्शन दक्षिणेकडील प्रसिद्ध दिग्दर्शक ॲटली यांनी करावे. शाहरुखने फरहानसमोर हा प्रस्ताव ठेवला आहे की, जर ॲटली या प्रोजेक्टशी जोडले गेले, तर तो चित्रपटात परत येण्याचा विचार करू शकतो.शाहरुख आणि ॲटली यांनी 'जवान'मध्ये एकत्र काम केले आहे. ॲटलीच्या दिग्दर्शनाखाली शाहरुखचा हा चित्रपट ब्लॉकबस्टर ठरला होता.

शाहरुख स्टारर 'डॉन: द चेज बिगेन अगेन' (Don: The Chase Begins Again) 2006 साली प्रदर्शित झाला होता. हा चित्रपट 1978 साली आलेल्या अमिताभ बच्चन यांच्या 'डॉन' चित्रपटाचा रिमेक होता.

शाहरुख स्टारर 'डॉन: द चेज बिगेन अगेन' (Don: The Chase Begins Again) 2006 साली प्रदर्शित झाला होता. हा चित्रपट 1978 साली आलेल्या अमिताभ बच्चन यांच्या 'डॉन' चित्रपटाचा रिमेक होता.

विशेष म्हणजे, फरहान अख्तर गेल्या तीन वर्षांपासून डॉन फ्रँचायझीच्या तिसऱ्या चित्रपटावर काम करत आहेत, परंतु कास्टिंगमुळे हा प्रकल्प सतत रखडला आहे. सुरुवातीला या चित्रपटासाठी रणवीर सिंगला कास्ट करण्यात आले होते, परंतु 'धुरंधर'च्या यशानंतर त्याने स्वतःला या चित्रपटातून वेगळे केले.

तथापि, काही अहवालांमध्ये असाही दावा करण्यात आला आहे की रणवीरला त्याच्या कथित अयोग्य मागण्यांमुळे चित्रपटातून काढून टाकण्यात आले.

रणवीर सिंह बाहेर पडल्यानंतर हृतिक रोशनलाही 'डॉन-3' ऑफर करण्यात आली होती, पण त्यानेही चित्रपट करण्यास नकार दिला. मूव्ही टॉकीजच्या रिपोर्टनुसार, हृतिक सध्या 'कृष-4' मधून दिग्दर्शन क्षेत्रात पदार्पण



करण्याच्या तयारीत आहे आणि त्याच्याकडे अनेक मोठे पॅन इंडिया चित्रपटही लाइनअपमध्ये आहेत. याच कारणामुळे त्याचे आगामी वेळापत्रक पूर्णपणे भरलेले आहे.

आता सगळ्यांच्या नजरा यावर खिळल्या आहेत की, डॉन-3 मध्ये शाहरुख खानचे दमदार पुनरागमन होते का आणि ॲटली या मेगा प्रोजेक्टचा भाग बनतो का.

## अर्थविश्व...

# बँकेचा नफा 55 % वाढला, शेअरमध्ये तेजी,

### गुंतवणूकदारांचं लक्ष, स्टॉकची किंमत 25 रुपयांपेक्षा कमी



खाजगी क्षेत्रातील येस बँकेने चालू आर्थिक वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीत 55 टक्क्यांची वाढ नोंदवत 952 कोटी रुपयांचा नफा मिळवला आहे.मागील वर्षीच्या याच तिमाहीत (डिसेंबर तिमाही) बँकेचा निव्वळ नफा 612 कोटी रुपये होता, तर चालू आर्थिक वर्षाच्या मागील सप्टेंबर तिमाहीत हा आकडा 654 कोटी रुपये होता. या तिमाहीत बँकेच्या नफ्यात लक्षणीय वाढ झाली आहे.

नफ्यात वाढीचं कारण

बँकेच्या मुख्य निव्वळ व्याज उत्पन्नात (NII) 10.9 टक्क्यांची वाढ होऊन ते 2,466 कोटी रुपये झाले आहे. या वाढीचे मुख्य कारण म्हणजे तरतुदींमध्ये झालेली मोठी घट, ज्यामुळे बँकेच्या नफ्याला चालना मिळाली. नवीन कामगार कायद्याच्या अंमलबजावणीमुळे बँकेला ग्रेच्युइटीसाठी 155 कोटी रुपयांची तरतूद करावी लागली.

येस बँकेच्या शेअरची किंमत 25 रुपयांपेक्षा कमी आहे. आठवड्याच्या शेवटच्या दिवशी शुक्रवारी शेअर 2.22% वाढून 23.45 रुपयांवर बंद झाला. या शेअरमध्ये गेल्या एका महिन्यात 8.81 टक्क्यांची वाढ झाली आहे. तर सहा महिन्याच्या कालावधीत झालेली वाढ ही 19.63 टक्के आहे. एक वर्षापूर्वी या शेअरमध्ये 11.77 टक्के वाढ झाली होती. सहा महिन्या पूर्वीपासून या शेअरमध्ये अधिक तेजी दिसून येत आहे. येस बँकेचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी प्रशांत कुमार यांनी निकालांवर चर्चा करताना सांगितले की, बँक नवीन कर्ज देण्याच्या बाबतीत सावध आहे. त्यामुळे, बँकिंग प्रणालीच्या दुहेरी अंकी सरासरी कामगिरीच्या तुलनेत बँकेची कर्ज वाढ कमी राहिली आहे. "कॉर्पोरेट कर्जाच्या क्षेत्रात तीव्र स्पर्धा आहे, तर गृह आणि कार कर्जाचे क्षेत्र फंडाच्या उच्च खर्चामुळे सध्या फार फायदेशीर नाही," असे कुमार यांनी नमूद केले. कुमार यांनी सांगितले की, बँकेने आर्थिक वर्ष 2025-26 साठी आठ टक्के कर्ज वाढीचे लक्ष्य ठेवले आहे. तिमाही दरम्यान बँकेचे गैर-व्याज उत्पन्न आठ टक्के वाढून 1,633 कोटी रुपये झाले.

## याला म्हणतात छप्परफाड... करोडपती शेअरचा धुमाकूळ! लाखभर रुपये गुंतवणारे झाले कोट्यधीश..! सतत लागतंय अप्पर सर्किट



शेअर मार्केटमध्ये असंख्य शेअर्सनी आजवर गुंतवणूकदारांना शानदार, जानदार परतावा दिला असून त्यापैकी स्पाइस लाउंज फूड वर्क्स लिमिटेड शेअर्सनी गुंतवणूकदारांच्या खिशात खळखळाट केला आहे. सलग दोन दिवस बाजारातील या मल्टीबॅगर स्टॉकमध्ये खरेदीची हिरवळ पसरली असून डिसेंबर 2025 मध्ये कंपनीने सिंगापूरस्थित प्रिशा इन्फोटेक विकत घेतल्यानंतर ही वाढ झाली.

या अधिग्रहणांमुळे अन्न सेवा आणि आतिथ्य क्षेत्रात कंपनीची पोहोच वाढत आहे पण गुंतवणूकदारांनी लक्षात ठेवावे की स्मॉल-कॅप स्टॉकमध्ये अनेकदा मूलभूत गोष्टींपेक्षा बाजारातील भावनांमुळे तीव्र चढ-उतार होतात.

स्पाइस लाउंज फूड वर्क्स शेअरमधेय शुक्रवारी, सलग दुसऱ्या दिवशी, खरेदी झाली. 16 जानेवारी रोजी 5% अप्पर सर्किट हिट केला आणि 36.28 रुपयांवर उसळी घेतली. महत्त्वाचे म्हणजे, या तेजीसाठी कोणतेही नवीन ट्रिगर आलेले नाहीत. स्पाइस लाउंज फूड वर्क्स शेअरमधेय शुक्रवारी, सलग दुसऱ्या दिवशी, खरेदी झाली. 16 जानेवारी रोजी 5% अप्पर सर्किट हिट केला आणि 36.28 रुपयांवर उसळी घेतली. यापूर्वी, बुधवारी हा शेअर 34.56 वर बंद झाला असून शुक्रवारी सकाळी 35.80 वर उघडला होता. महत्त्वाचे म्हणजे, या तेजीसाठी कोणतेही नवीन ट्रिगर आलेले नाहीत.

तुम्हीपण स्मॉल-कॅपमध्ये गुंतवणूक करत असाल किंवा करायचा विचार करत असाल तर लक्षात असू द्या की स्मॉल-कॅप स्टॉक्सच्या किमतीत जलद चढ-उतार होतात. या हालचाली बहुतेकदा कंपनीच्या प्रत्यक्ष कामगिरीपेक्षा (मूलभूत) बाजारातील भावनांमुळे जास्त प्रभावित होतात.

अधिग्रहणामुळे स्पाइस लाउंजला कसा फायदा?

एक्सचेंज फाइलिंगनुसार, प्रिशा इन्फोटेक एंटरप्राइझ सॉफ्टवेअर, डिजिटल प्लॅटफॉर्म आणि ग्राहक-भिमुख व्यवसायांसाठी तंत्रज्ञान उपायांमध्ये विशेषज्ञ आहे. या अधिग्रहणामुळे कंपनीच्या ब्रँड आणि आउटलेटच्या वाढत्या पोर्टफोलिओला फायदा होईल. यामुळे कंपनीला सुधारित ऑपरेशनल कार्यक्षमता, चांगले ग्राहक सहभाग आणि डेटा-चालित निर्णय घेण्यास मदत होईल.

पाच वर्षात गुंतवणूकदारांना मल्टीबॅगर परतावा

गेल्या काही दिवसांत स्पाइस लाउंज फूड वर्क्स शेअरच्या किमतीत मोठी चढ-उतार दिसून आली असून मागील महिन्यात या स्मॉल-कॅप स्टॉकमध्ये 31% घसरण झाली पण, गेल्या सहा महिन्यांत 3% वधारला आहे. याशिवाय दीर्घकाळात स्पाइस लाउंज फूड वर्क्सच्या शेअर्सनी गुंतवणूकदारांना भरभरून परतावा दिला आहे. गेल्या वर्षी 164% आणि पाच वर्षांत 3000% असा मल्टीबॅगर वाढ नोंदवली आहे. अशाप्रकारे, एखाद्याने पाच वर्षांपूर्वी या स्टॉकमध्ये 3.5 लाख रुपये गुंतवले असतील तर आज त्यांच्या गुंतवणुकीचे मूल्य 1 कोटी 8 लाख 50 हजार रुपये झाले असतील.

# वैभव सूर्यवंशी बांगलादेशच्या खेळाडूला भर मैदानात भिडला, सामना सुरु असताना कशावरून झाला राडा



नवी दिल्ली : बांगलादेशमध्ये हिंदूवर अत्याचार होत आहेत आणि आता मैदानातही त्यांचे खेळाडू भारताच्या वैभव सूर्यवंशीची कळ काढया गेला. पण वैभव सूर्यवंशीने थेट मैदानातच राडा घातला. वैभव सूर्यवंशी यावेळी बांगलादेशच्या खेळाडूला भर मैदानात भिडल्याचे सर्वांनी पाहिले.

भारत आणि बांगलादेश यांच्यातील सामना वादानेच सुरु झाला. कारण या सामन्यासाठी भारत आणि बांगलादेश या दोन्ही संघांचे कर्णधार टॉससाठी आले होते. त्यावेळी बांगलादेशचा कर्णधार भारताचा कॅप्टन आयुष म्हात्रेशी हात मिळवायला आला. पण त्यावेळी आयुष म्हात्रेने त्याच्याशी हस्तांदोलन न करत त्यांना त्याची जागा दाखवून दिली. ही गोष्ट बांगलादेशच्या खेळाडूंच्या जिव्हारी लागली. त्यामध्येच भारताची प्रथम फलंदाजी होती. भारताची २ बाद १२ अशी अवस्था झाली होती. त्यानंतर वैभव सूर्यवंशाने धडाकेबाज फटकेबाजीला सुरुवात केली. वैभवने आपले अर्धशतकही झळकावले. त्यामुळे बांगलादेशचा खेळाडू जास्तच चिडले. यावेळी बांगलादेशचा खेळाडू झवाद अबरार हा वैभव सूर्यवंशीची कळ काढायला गेला. त्यावेळी वैभव सूर्यवंशीने आपले रौद्ररुप त्याला दाखवले. भर मैदानात वैभव सूर्यवंशी त्याच्या दिशेने गेला आणि त्याला हातानेच असा इशारा केला की तो त्यानंतर गपगारच झाला. वैभवचा पारा यावेळी चांगलाच चढलेला होता. वैभव रागाच्या भरात जेव्हा बांगलेदशच्या खेळाडूला भिडायला गेला तेव्हा सर्वांनाच काळजी वाटत होती. पण वैभवला त्यावेळी नेमकं काय करायचं, हे चांगलंच माहिती होतं. फक्त आपला हातच दाखवत त्याने बांगलादेशच्या खेळाडूंना शांत केलं. वैभवने त्यानंतर तडफदार फटकेबाजी करत बांगलादेशच्या गोलंदाजीची हवाच काढून टाकली.भारत आणि बांगलादेश यांच्यात १९ वर्षांखालील वर्ल्ड कपचा सामना सुरु झाला. भारताचा हा दुसरा सामना होता. यापूर्वी भारताचा पहिला सामना हा अमेरिकेबोरबर झाला होता. या सामन्याच भारताने अमेरिकेवर मोठा विजय मिळवला होता. आता बांगलादेशविरुद्धच्या सामन्यातही भारताने दमदार फलंदाजी केली. वैभव सूर्यवंशीने त्यानंतर चांगली फटकेबाजीही केली. पण त्यापूर्वी वैभव हा बांगलादेशच्या खेळाडूवर चांगलाच भडकल्याचे सर्वांना पाहायला मिळाले होते.

# भारताच्या कर्णधाराने बांगलादेशची जगासमोर लाज काढली, वर्ल्ड कपच्या सामन्यापूर्वी त्यांना जागाच दाखवली

नवी दिल्ली : बांगलादेशची आता भारताच्या कर्णधाराने जगासमोर लाज काढली. भारत आणि बांगलादेश यांच्यात आज १९ वर्षांखीलल वर्ल्ड कपचा सामना सुरु झाला आहे. या सामन्यापूर्वी भारताचा कर्णधार आयुष म्हात्रेने बांगलादेशची सर्वांसमोर लाज काढली आहे.

भारतीय संघ आयुष म्हात्रेच्या नेतृत्वाखाली १९ वर्षांखालील वर्ल्ड कप खेळण्यासाठी झिम्बाब्वेमध्ये दाखल झाला आहे. भारताचा या वर्ल्ड कपमधील पहिला सामना हा अमेरिकेबरोबर झाला होता. या सामन्यात भारताने अमेरिकेला फक्त १०७ धावांत ऑल आऊट केले होते. या सामन्यात वैभव सूर्यवंशी फक्त दोनच धावांवर बाद झाला. पण तरीही भारताने हा सामना मोठ्या फरकाने जिंकला होता. त्यानंतर आता भारताचा दुसरा सामना हा बांगलादेशबरोबर सुरु झाला आहे. बांगलादेशने भारताला धक्का देण्यासाठी वर्ल्ड कपचे कार्ड काढले. आम्ही भारतात वर्ल्ड कपचा एकही सामना खेळणार नाही, असे त्यांनी म्हटले. बांगलादेशमध्ये हिंदूंवर जो अत्याचार होत आहे, त्याविरोधात आता भारताचा कर्णधारही मैदानात या सामन्यात उतरल्याचे पाहायला मिळाले. भारत आणि बांगलादेश यांच्यातील सामन्याचा टॉस करण्यासाठी दोन्ही कर्णधारांना सामनाधिकाऱ्यांनी मैदानात आमंत्रित केले. भारताचा कर्णधार आयुष म्हात्रे आणि बांगलादेशचा कॅप्टन अझिझूल हकीम हे मैदानात आले. टॉस झाला आणि त्यानंतर दोन्ही कर्णधार हस्तांदोलन करतात. पण भारताचा कर्णधार सूर्यकुमार यादवने यापूर्वी आशिया कप स्पर्धेत पाकिस्तानच्या कर्णधाराशी हस्तांदोलन न करता त्यांना त्यांची जागा दाखवली होती आणि जगासमोर लाज काढली होती. या सामन्यापूर्वी आयुष म्हात्रेनेही हीच गोष्ट केली. बांगलादेशचा कर्णधार हात मिळवण्याच्या तयारीत होता. पण आयुष म्हात्रेने यावेळी त्याच्याशी हात मिळवला नाही. जी गोष्ट पाकिस्तानबरोबर केली तीच आम्ही आता बांगलादेशबरोबर करणार, हेच आता भारतीय संघाने सर्वांसमोर स्पष्ट केलं आहे. त्यामुळे यापुढे भारत आणि बांगालेदश यांच्यात क्रिकटेच्या मैदानातील वाद अधिक वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.भारताचा कर्णधार आयुष म्हात्रेने आता बांगलादेशला त्यांची जागा दाखवून दिली आहे. बांगलादेशविरुद्धच्या सामन्यापूर्वी नेमकं केलं तरी काय, हे आता समोर आले आहे.



# महापालिका निवडणुकीमध्ये RCB खेळाडूच्या पत्नीचा डंका, माजी मंत्र्यांच्या लेकीने मैदान मारलं




जालना : राज्यात महापालिका निवडणुकांचा निकाल लागला आहे. या निकालांमध्ये भाजपने सर्वत्र बाजी मारल्याचं दिसून आलं. तब्बल २४ महापालिकांमध्ये भाजपने आपला झेंडा फडकावलाय. विशेष म्हणजे गेली २५ वर्ष ठाकरे यांच्या ताब्यात असलेली मुंबई महापालिका आता भाजपने शिंदेंच्या साथीने जिंकलीय. यंदाच्या निवडणुकीमध्ये जालना आणि इचलकरंजी या दोन नवीन महापालिकांची पहिलीच निवडणूक होती. या दोन्ही महापालिका भाजपने जिंकल्यात, या निवडणुकीमध्ये आयपीएलमधील आरसीबी संघाच्या स्टार खेळाडूची पत्नीसुद्धा निवडणुकीच्या रिंगणात होती. नेमका कोणता खेळाडू? पत्नी निवडून आली की नाही?जालना महापालिका निवडणुकीमध्ये खेळाडू विजय झोल याची पत्नी उभी होती. विजय झोल याने देशांतर्गत क्रिकेटमध्ये दमदार कामगिरी केली आहे. महाराष्ट्राचं रनमशिन असा लौकिक मिळवलेल्या विजय झोल याच्या पत्नीने निवडणूक जिंकली आहे. जालना महापालिकेमध्ये शिवसेनेकडून प्रभाग क्रमांक १६ क मधून निवडणुकीच्या रिंगणात उभ्या होत्या. या निवडणुकीत त्यांना ४ हजार ४५१ मतं मिळाली असून त्यांचा विजय झाला आहे. दर्शना यांना निवडून आणण्यासाठी आमदार अर्जुन खोतकर यांची प्रतिष्ठा पणाला लागली होती. कारण माजी मंत्री आमदार अर्जुन खोतकर यांच्यासाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची होती आमदार अर्जुन खोतकर यांची एकुलती एक कन्या या प्रभागांमध्ये उभी होती, शेवटी गुलाल उधळत आपल्याकडे विजय खेचून आणला. दरम्यान, जालना महानगरपालिकेमध्ये एकूण ६५ जागा आहेत, त्यामधील ४२ जागांवर विजय मिळवला. शिंदे गट १२, काँग्रेस ८, एमआयएमला २ तर १ जागा अपक्षाने जिंकली आहे.

जालन्याचा विजय झोल हा प्रसिद्ध खेळाडू असून त्याने रणजी, विजय हजारे आमि सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये दमदार कामिरी केली आहे. महाराष्ट्राचं प्रतिनिधित्त्व करताना त्याने स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली. २०१२ मध्ये, विजय झोल भारतीय १९ वर्षांखालील संघाचा एक महत्त्वाचा भाग होता, ज्याने विश्वचषक जिंकला. त्यानंतर २०१४ मध्ये, तो याच संघाचा कर्णधार बनला. कर्णधार म्हणूनही त्याने चांगली कामगिरी केली. त्याच्या नेतृत्वाखाली संघाने चार मालिका जिंकल्या. मात्र, विश्वचषकात भारतीय संघाला उपांत्यपूर्व फेरीतच बाहेर पडावे लागले. यानंतर, २०१४ च्या आयपीएल लिलावात रॉयल चॅलेंजर्स बंगळूरने त्याला आपल्या संघात स्थान दिले होते.

# भारतीय संघाच्या टी-20 विश्वचषक मोहिमेला सुरुंग

मुंबई : आगामी टी-२० वर्ल्ड कपच्या तोंडावर भारतीय क्रिकेट संघाच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे. संघाचा महत्त्वाचा अष्टपैलू खेळाडू वॉशिंग्टन सुंदर दुखापतीमुळे न्यूझीलंड विरुद्धच्या उर्वरित वन-डे मालिकेनंतर आता संपूर्ण टी-२० मालिकेतूनही बाहेर पडला आहे. विशेष म्हणजे, या दुखापतीचे गांभीर्य पाहता सुंदरच्या वर्ल्ड कपमधील सहभागावरही आता टांगती तलवार निर्माण झाली आहे. न्यूझीलंड विरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात गोलंदाजी करत असताना वॉशिंग्टन सुंदरला 'साईड स्ट्रेन'चा त्रास जाणवला. या सामन्यात केवळ ५ षटके टाकल्यानंतर त्याला वेदनांमुळे मैदानाबाहेर जावे लागले होते. जरी त्याने नंतर फलंदाजीसाठी मैदानात धाव घेतली असली, तरी त्याची दुखापत



गंभीर असल्याचे वैद्यकीय तपासणीत समोर आले आहे. बीसीसीआयने तातडीने निर्णय घेत वॉशिंग्टन सुंदरला वनडे मालिकेतून विश्रांती दिली असून, त्याच्या जागी युवा फलंदाज आयुष बदोनी याला संघात स्थान दिले आहे. सुंदरला अधिक उपचार आणि पुनर्वसनासाठी बंगळूरु येथील 'सेंटर ऑफ एक्सलन्स'मध्ये दाखल होण्याचे आदेश देण्यात आले आहेत. हाती आलेल्या वृत्तानुसार, भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील ५ टी-२० सामन्यांच्या मालिकेत तो खेळू शकणार नाही हे स्पष्ट झाले आहे. मात्र, सर्वात मोठी चिंता ही आहे की टी-२० वर्ल्ड कप सुरू होण्यासाठी खूप कमी कालावधी शिल्लक आहे आणि तोपर्यंत सुंदर पूर्णपणे फिट होण्याची शक्यता कमी असल्याचे बोलले जात आहे. भारतीय संघासाठी सुंदरची अनुपस्थिती हा मोठा धक्का मानला जात आहे, कारण तो गोलंदाजी आणि फलंदाजी या दोन्ही आघाड्यांवर संघाचा महत्त्वाचा कणा होता. आता वर्ल्ड कपसाठी संघ व्यवस्थापन त्याच्या जागी कोणाचा विचार करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# गौतम गंभीर यांना हरभजन सिंगची चपराक

भारताचा तिसरा वनडे सामना काही तासांवर येऊन ठेपला आहे. पण या तिसऱ्या सामन्यापूर्वी भारताचे प्रशिक्षक गौतम गंभीर यांना हरभजन सिंगने चांगलीच चपराकच लगावली आहे. त्याचबरोबर भारतीय संघ का पराभूत होत आहे आणि आपल्याला कोणत्या गोष्टीची खंत वाटते, हेदेखील हरभजन सिंग सांगायला विसरला नाही.

'प्रत्येक संघासाठी अष्टपैलू खेळाडू महत्त्वाचे आहेत, पण विकेट घेण्यासाठी तज्ज्ञ गोलंदाज जास्त महत्त्वाचे आहेत', असे प्रतिपादन भारताचा दिग्गज फिरकी गोलंदाज हरभजन सिंगने केले. त्याने भारताकडे चांगल्या ऑफस्पिनर गोलंदाजांची खूपच वानवा असल्याची खंतही व्यक्त केली. मुंबई इंडियन्स संघाच्या कार्यक्रमात हरभजनने निवडक पत्रकारांशी संवाद साधला. भारतीय संघव्यवस्थापन काही वर्षांपासून तज्ज्ञ गोलंदाजांऐवजी अष्टपैलूंना प्राधान्य देत आहे. मात्र हे हरभजनला मान्य नाही. 'संघासाठी नक्कीच अष्टपैलू महत्त्वाचे आहेत, पण स्पेशालिस्ट गोलंदाजांचे महत्त्व कधीही कमी होत नाही. जसप्रीत बुमराह, मोहम्मद शमीसारखे तज्ज्ञ गोलंदाज संघासाठी जे करतात ते कोणीच करीत नाहीत. तज्ज्ञ गोलंदाज दहापैकी आठवेळा यशस्वी होतील, तर अष्टपैलूंचे असलेले गोलंदाज यशस्वी होण्याचे प्रमाण ४० टक्के असेल', याकडे हरभजनने लक्ष वेधले.

दिग्गज ऑफस्पिनर हरभजनला ही कला लुप्त होत असल्याची खंत आहे. 'ऑफस्पिनरना आता काही अर्थ नाही, असे का म्हटले जाते ते मला कळत नाही. हा मारा करणे सोपे असते तर कोणीही हा गोलंदाज झाला असता. मात्र आपल्याला ऑफस्पिनर कुठे दिसतच नाहीत. ही कला आत्मसात करण्यासाठी कठोर मेहनत घ्यावी लागती. देशांतर्गत स्पर्धेतही फारसे गोलंदाज दिसत नाहीत. विदर्भचा एक ऑफस्पिनर (अक्षय वाखरे) चांगली कामगिरी करीत होता, पण तो आता निवृत्त झाला आहे, वॉशिंग्टन सुंदर तंदुरुस्त होऊन संघात येईल, अशी आशा आहे', अशी अपेक्षा त्याने व्यक्त केली.

हरभजन सिंगने भारताच्या



पराभवाचे कारण सांगताना संघात कसे खेळाडू असायला हवे, हे स्पष्टपणे सांगितले आहे. त्याचबरोबर तिसऱ्या वनडे सामन्यापूर्वी आता हरभजन सिंगने आपली एक खंतही सर्वांसमोर व्यक्त केली आहे.

# शिंदे-अजित पवारांच्या गैरहजरीत देवेंद्र फडणवीस सरकारचे मोठे निर्णय

## नगरविकास विभागासह पुण्यालाही निधी; अंतर्गत तणाव उघड की तात्पुरती नाराजी


**दिव्य वतन /वृत्तसेवा**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या मंत्रिमंडळ बैठकीत अनेक महत्त्वाचे धोरणात्मक निर्णय घेण्यात आले असले, तरी या बैठकीकडे संपूर्ण राज्याचं लक्ष वेधलं गेलं ते वेगळ्याच कारणामुळे. राज्याचे दोन्ही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, हे या कॅबिनेट बैठकीला गैरहजर राहिले. विशेष म्हणजे, दोघेही राज्यातच उपस्थित असतानाही त्यांनी बैठकीस हजेरी लावली नाही. एकनाथ शिंदे मुंबईत तर अजित पवार पुण्यात असतानाही कॅबिनेटला दांडी मारल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे. महापालिका निवडणुकांच्या निकालानंतर निर्माण झालेली अस्वस्थता आणि नाराजी याचं प्रतिबिंब थेट प्रशासनावर पडतंय का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

महापालिका निवडणुकांनंतर राज्यातील सत्तासमीकरणं ढवळून निघाली आहेत. विशेषतः मुंबई महानगरपालिकेतील सत्तासंघर्ष, नगरसेवकांना हॉटेलमध्ये ठेवण्याची सुरू असलेली 'हॉटेल पॉलिटिक्स' आणि त्याचवेळी कॅबिनेट बैठकीकडे दुर्लक्ष, या सगळ्या घडामोडी एकमेकांशी जोडल्या जात आहेत. निवडणुकीतील अपेक्षाभंगामुळे दोन्ही उपमुख्यमंत्री नाराज असल्याची चर्चा आहे.

त्यामुळे सरकारमध्ये सर्वकाही आलबेल आहे का, महायुतीतील अंतर्गत समन्वयाला तडे गेलेत का, असे सवाल राजकीय विश्लेषक उपस्थित करत आहेत. एकीकडे सत्तास्थापन टिकवण्यासाठी आटापिटा सुरू असताना, दुसरीकडे सर्वोच्च प्रशासकीय बैठकीत गैरहजेरी ही बाब सरकारसाठी अस्वस्थ करणारी मानली जात आहे.

दरम्यान, या सर्व राजकीय चर्चांच्या पार्श्वभूमीवर फडणवीस सरकारने अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या 1 हजार 901 पदांच्या आकृतीबंधास मंत्रिमंडळाने मान्यता दिली असून, या संचालनालयाचे नाव आता 'अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय' असे करण्यात येणार आहे. जिल्हा नियोजन समित्या, सहआयुक्त (नियोजन), विभागीय आयुक्त कार्यालय, मानव विकास कार्यक्रम, वैधानिक विकास मंडळ, तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रम तसेच नक्षलवाद विशेष कृती आराखडा कक्ष यांच्यासाठी आवश्यक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा सुधारित आकृतीबंध मंजूर करण्यात आला आहे. यामुळे नियोजन विभागाच्या कार्यक्षमतेत वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



नगरविकास विभागाशी संबंधित काही महत्त्वाचे निर्णयही या बैठकीत घेण्यात आले. अटल बिहारी वाजपेयी शिवडी-न्हावाशेवा अटल सेतूवरील पथकर सवलत आणखी एक वर्ष वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला असून, यामुळे वाहनधारकांना दिलासा मिळणार आहे. तसेच मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा–2 (MUTP-2) साठी सुधारित खर्चास आणि शासनाचा हिस्सा उचलण्यास मंत्रिमंडळाची मंजुरी देण्यात आली. तिरूपती देवस्थानास पद्मावती देवी मंदिरासाठी उलवे येथील दिलेल्या भूखंडाचे शुल्क माफ करण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे. याशिवाय, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळास पनवेल (पश्चिम) येथील भूखंड देण्यास मान्यता देण्यात आली असून, तेथे मुख्यालय आणि बहुउद्देशीय इमारत उभारली जाणार आहे.

शहरी वाहतूक आणि पर्यावरणपूरक उपक्रमांवरही सरकारने भर दिला आहे. पीएम-ई ड्राईव्ह योजनेंतर्गत पुणे महानगर परिवहन महामंडळासाठी एक हजार ई-बससाठी निधी वळता करण्याच्या थेट प्रणालीस मान्यता देण्यात आली आहे. पेमेंट सिक्युरिटी मेकॅनिझम अंतर्गत पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या खात्यातून डायरेक्ट डेबिट मॅन्डेटद्वारे संबंधित कंपन्यांना थेट देयके अदा केली जाणार आहेत. यामुळे सार्वजनिक वाहतूक अधिक सक्षम आणि पर्यावरणपूरक होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

ग्रामीण आणि कृषी क्षेत्रालाही मंत्रिमंडळाने प्राधान्य दिले. भाजीपाला निर्यातीसाठी ठाणे जिल्ह्यातील मौजे बापगाव (ता. भिवंडी) येथे सर्वोपयोगी मल्टी-मॉडेल हब आणि टर्मिनल मार्केट उभारण्यास मंजुरी देण्यात आली आहे. यासाठी राज्य कृषी पणन महामंडळाला 7 हेक्टर 96.80 आर जमीन उपलब्ध करून दिली जाणार आहे. येथे व्हेपर हिट ट्रीटमेंट, प्लांट विकिरण, पॅक हाऊस सुविधा तसेच फळे-भाजीपाला साठवणुकीसाठी आधुनिक सुविधा उभारल्या जाणार आहेत. दुसरीकडे, यवतमाळ जिल्ह्यातील बेंबळा नदी प्रकल्पासाठी 4 हजार 775 कोटी रुपयांची मान्यता देण्यात आली असून, या प्रकल्पामुळे पाच तालुक्यांतील 52 हजार 423 हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. अमरावती जिल्ह्यातील मौजा धामकच्या पुनर्वसनाचा प्रश्नही मार्गी लावण्यात आला आहे.

गृह आणि कौशल्य विकास क्षेत्रातही मोठे निर्णय घेण्यात आले. मुंबईतील पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी 45 हजार शासकीय निवासस्थाने उभारण्याच्या मुंबई पोलिस हाऊसिंग टाऊनशिप प्रकल्पास मंजुरी देण्यात आली आहे. यामुळे मुंबई शहर व उपनगरातील पोलीस कर्मचाऱ्यांचा निवासाचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटणार आहे. तसेच राज्यातील युवकांना परदेशात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी 'महाराष्ट्र व्यापक आंतरराष्ट्रीय गतीशीलता आणि क्षमता संस्था' म्हणजेच 'महिमा' स्थापन करण्यास हिरवा कंदील देण्यात आला आहे. ही संस्था प्रशिक्षित आणि कुशल युवकांना जागतिक रोजगार बाजाराशी जोडण्याचं महत्त्वाचं काम करणार आहे.एकूणच, एकीकडे कॅबिनेट बैठकीत घेतलेले व्यापक आणि दूरगामी निर्णय सरकारची प्रशासनिक गती दर्शवतात, तर दुसरीकडे उपमुख्यमंत्र्यांची गैरहजेरी आणि निवडणूक निकालानंतर सुरू असलेली अस्वस्थता राज्याच्या राजकारणात नवे प्रश्न उभे करत आहे. महायुतीतील अंतर्गत तणाव उघड होतो आहे का, की ही केवळ तात्पुरती नाराजी आहे, याकडे आता साऱ्यांचं लक्ष लागलं आहे.

## पराभवाने खचायचे नाही, काम करत राहायचे:अजित पवार यांचा कार्यकर्त्यांना सल्ला; मनपा निवडणुकीत अंदाज चुकल्याची दिली कबुली


**दिव्य वतन /वृत्तसेवा**

सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महापालिका निवडणुकीत मिळालेल्या विजयाबद्दल भाजपचे कौतुक केले आहे. भाजपने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात ही निवडणूक लढली. त्यांना अतिशय चांगले यश मिळाले व इतरांचा पराभव झाला. पराभवाने खचायचे नसते. आपण आपले काम करत राहायचे असते, असे ते म्हणालेत.

महापालिका निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसची प्रचंड हाराकिरी झाली आहे. राज्यातील 29 महापालिकांत या पक्षाला केवळ 167 जागांवर समाधान मानावे लागले. विशेषतः पुणे महापालिकेत दोन्ही राष्ट्रवादीची युती असूनही त्यांना केवळ 30 जागांवर समाधान मानावे लागले. पिंपरी चिंचवडमध्येही त्यांना केवळ 37 जागा मिळाल्या. या पार्श्वभूमीवर अजित पवारांनी आज पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी भाजपचे कौतुक करत राष्ट्रवादी काँग्रेस भविष्यात अधिक जोमाने काम करेल असे स्पष्ट केले.

**मीडियासह आमचेही अंदाज चुकले**

अजित पवार म्हणाले, लोकशाहीत मतदार राजा हा फार महत्त्वाचा असतो. प्रयत्न करणे प्रत्येक राजकीय पक्षाचे काम असते. प्रत्येकांनी प्रयत्न केले. पण भाजपला अतिशय चांगले यश मिळाले. या प्रकरणी मी भाजपचे मनापासून अभिनंदन करतो. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात भाजपने या सगळ्या निवडणुका लढल्या. त्यांना खूप चांगला प्रतिसाद मिळाला. त्यात इतरांचा पराभव झाला. माझे स्वतःचे



गणित असे आहे की, पराभवाने खचून जायचे नसते. पुन्हा आपले काम करत राहायचे असते.

आज पहाटे 3 वाजेपर्यंत काही जागांवरील निकाल लागले. त्यानंतर आम्ही बसून कुठे काय झाले? याची माहिती घेऊ. मीडिया सुद्धा म्हणत होता की चांगले वातावरण आहे. आमचे अंदाज चुकले, तसे मीडियाचेही अंदाज चुकले. ठीक आहे.

अजित पवार म्हणाले, सध्या निवडणुकीची घाई आहे. आज 17 तारखेपासून जिल्हा परिषदेच्या निवडणुकीचे फॉर्म भरण्यास सुरुवात झाली. उद्या 18 तारखेला सुट्टी आहे. सुप्रीम कोर्टाने 31 तारखेच्या आत निवडणुका घेण्याचे निर्देश दिले होते. त्यात आता 15 दिवसांची वाढीव मुदत मिळाली आहे. आता 50 टक्के आरक्षणाच्या आत केवळ 12 जिल्हा परिषदा आहेत. तेथील भौगोलिक व राजकीय परिस्थिती पाहून आमचे स्थानिक पदाधिकारी योग्य तो निर्णय घेतील.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत स्थानिक पातळीवरील कार्यकर्त्यांना व पदाधिकाऱ्यांना अधिकार दिले जातात. त्यानुसार ते लोक तेथील योग्य तो निर्णय घेतात. आतापर्यंतच्या सर्वच निवडणुकांत असे होते. तूर्त आम्ही महायुतीत काम करत आहोत.

## ठाकरे बंधू छत्रपती संभाजीराजेंना पकडण्यात मदत करणाऱ्यांसारखेच

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

मुंबई महानगरपालिका निवडणुकीत भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना गटाने विजय मिळवत सत्ता हस्तगत केली, तर शिवसेना ठाकरे गट आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला पराभव स्वीकारावा लागला. केवळ मुंबईच नव्हे तर राज्यातील 29 महापालिकांपैकी सुमारे 25 महापालिकांमध्ये भाजपने निर्विवाद वर्चस्व सिद्ध केलं आहे. या निकालानंतर राज्याच्या राजकारणात मोठी उलथापालथ झाली असून आरोप-प्रत्यारोपांची तीव्रता वाढली आहे. शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी एकनाथ शिंदे आणि



भाजपवर जोरदार हल्लाबोल करताच भाजपचे मंत्री नितेश राणे यांनीही तितक्याच आक्रमक भाषेत प्रत्युत्तर दिलं आहे.संजय राऊत यांनी मुंबईतील सत्तांतरासाठी थेट एकनाथ शिंदेंना जबाबदार धरत अत्यंत जहाल शब्दांत टीका केली. एकनाथ शिंदे जयचंद झाले नसते, तर भाजपच्या शंभर पिढ्या उतरल्या असत्या तरी मुंबईवर महाराष्ट्रद्वेष्ट्यांचा महापौर बसला नसता, असा आरोप त्यांनी केला.

## देवाच्या मनात असेल तर आपला महापौर होईल:उद्धव ठाकरेंचं सूचक विधान विजयाचं श्रेय स्वत:कडे न घेता पूर्णपणे कार्यकर्त्यांच्या चरणी

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पुन्हा एकदा आक्रमक भूमिका घेत भाजप आणि शिंदे गटावर जोरदार हल्लाबोल केला आहे. मुंबईतील नवनिर्वाचित नगरसेवकांनी आज 'मातोश्री'वर उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. यावेळी बोलताना ठाकरे यांनी, आमच्यात आणि भाजपमध्ये मूलभूत फरक आहे. त्यांना वाटतं कागदावरची शिवसेना त्यांनी संपवली, पण जमिनीवरची शिवसेना ते कधीच संपवू शकत नाहीत, असा खणखणीत टोला लगावला. भाजप आणि शिंदे गट जमिनीवर राहू शकत नाहीत, हेच त्यांचं अपयश असल्याचंही त्यांनी सूचित केलं.

महापौरपदाबाबत बोलताना उद्धव ठाकरे यांनी सूचक विधान केलं. आपला महापौर व्हावा, हे स्वप्न आहे. देवाच्या मनात असेल तर तेही होईल, असं म्हणत त्यांनी आशा कायम असल्याचं संकेत दिले. मात्र, त्यांनी सत्तेच्या गणितांपेक्षा लढ्याच्या मूल्यांवर अधिक भर दिला. गद्दारी करून जो विजय मिळवला जातो, तो मुंबई गहाण ठेवण्यासाठीच असतो, असा गंभीर आरोप त्यांनी केला. या पापाला मराठी माणूस कधीही माफ करणार नाही, असं ठाम मत त्यांनी व्यक्त केलं.

या भेटीदरम्यान उद्धव ठाकरे यांनी नवनिर्वाचित नगरसेवकांचं कौतुक करत विजयाचं संपूर्ण श्रेय कार्यकर्त्यांनाच दिलं. या निकालाचे खरे मानकरी तुम्ही सगळे आहात. आम्ही फक्त निमित्त ठरलो, असं म्हणत त्यांनी कार्यकर्त्यांचा गौरव केला. सध्याच्या राजकीय परिस्थितीत जो निकाल लागला, तो अभिमानास्पद असल्याचं मत त्यांनी व्यक्त केलं. सत्तेचा गैरवापर, यंत्रणांचा दबाव आणि साम-दाम-दंड-भेद या सगळ्या गोष्टी असूनही शिवसैनिकांनी जिद्दीने लढा दिला, याचा आपल्याला अभिमान असल्याचं ठाकरे यांनी स्पष्ट केलं.

उद्धव ठाकरे यांनी गद्दारीच्या मुद्द्यावरही थेट हल्ला चढवला. गद्दार निघून गेले, पण ते आमची निष्ठा विकत घेऊ शकले नाहीत, असं म्हणत त्यांनी शिंदे गटावर टीका केली. आपण सर्व शिवसैनिकांना मानाचा मुजरा करतो, कारण या लढाईनंतर प्रत्येकाची जबाबदारी अधिक वाढली आहे, असं त्यांनी नमूद केलं. सत्ता आणि पैशाच्या जोरावर राजकारण जिंकता येईल, असा गैरसमज काहींनी करून घेतला, पण निष्ठा आणि जिद्द पैशाने विकत घेता येत नाही, हे या निकालातून पुन्हा सिद्ध झालं, असा टोला त्यांनी लगावला.

ठाकरे यांनी सांगितलं की, निवडणूक प्रचारादरम्यान आपण कार्यकर्त्यांना कोणत्याही विशेष सोयी-सुविधा देऊ शकलो नाही. आपल्याकडे तन-मन आहे, त्यांच्याकडे फक्त धन आहे, असं म्हणत त्यांनी संघर्षातील तफावत अधोरेखित केली. तरीही कार्यकर्त्यांनी केवळ शक्ती आणि आत्मविश्वासाच्या जोरावर विरोधकांना घाम फोडला, असं त्यांनी सांगितलं. हीच ताकद भविष्यातही एकत्र ठेवा, कारण पुढच्या पिढीलाही तुमचा अभिमान वाटला पाहिजे, असा संदेश त्यांनी दिला.

उद्धव ठाकरे यांनी विजयाचं श्रेय स्वतःकडे न घेता पूर्णपणे कार्यकर्त्यांच्या चरणी अर्पण केलं. मी तुमच्या चरणी नतमस्तक होऊन हा विजय तुम्हालाच समर्पित करतो, असं भावनिक विधान त्यांनी केलं. ही लढाई अजून संपलेली नाही, तर ती केवळ एका टप्प्यावर आली आहे, असं सांगत त्यांनी कार्यकर्त्यांना सतर्क राहण्याचं आवाहन केलं. जिद्द हा सर्वात



मोठा भांडवल असून ती कोणीही विकत घेऊ शकत नाही, याची आठवण त्यांनी करून दिली.

भविष्यातील राजकीय संघर्षाबाबत बोलताना उद्धव ठाकरे यांनी आत्मविश्वास व्यक्त केला. जिद्दीच्या जोरावर आणि निष्ठेच्या बळावर आपण पुन्हा जिंकू, असा विश्वास त्यांनी कार्यकर्त्यांना दिला. सत्ता येते-जात असते, पण शिवसेनेची ओळख ही जमिनीवर काम करणाऱ्या शिवसैनिकांमुळे कायम आहे, असं सांगत त्यांनी संघर्ष सुरूच राहणार असल्याचा स्पष्ट संदेश दिला. मातोश्रीवर झालेल्या या भेटीतून ठाकरे गटाने पराभवानंतरही आक्रमक आणि आत्मविश्वासपूर्ण भूमिका घेतल्याचं चित्र स्पष्ट झालं आहे.

## महत्त्वाचे...

### राज ठाकरेंचा 'अदानी' विरोध धारावीत चालला




मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत भाजप - शिंदे गटाचा विजय झाला. तर ठाकरे बंधूंच्या युतीला अवघ्या 71 जागांवर समाधान मानावे लागले. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी या निवडणुकीत उद्योगपती गौतम अदानी यांच्यावर टीकेची झोड उठवली. धारावीच्या माध्यमातून अदानी अख्खी मुंबई गिळंकृत करण्याचा डाव रचत असल्याचा आरोप करत त्यांनी धारावीकरांना याविरोधात ठामपणे उभे राहण्याचे आवाहन केले होते. त्याला आता निवडणूक निकालात जोरदार प्रतिसाद मिळाल्याचे दिसून येत आहे. धारावीतील 7 पैकी 6 जागांवर ठाकरे बंधू व काँग्रेसचा दणदणीत विजय झाला आहे. धारावीच्या वॉर्ड क्रमांक 185 मध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार टी एम जगदीश यांनी भाजपच्या रवी राजा यांचा 2 हजारांहून अधिक मतांनी पराभव केला. रवी राजा हे काँग्रेसमधून भाजपमध्ये गेले होते. ते मुंबई महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते होते. ते सायन - कोळीवाड्यातून लढत होते. धारावी त्यांचा मूळ मतदारसंघ नव्हता. याऊलट जगदीश हे याच वॉर्डाचे माजी नगरसेवक असल्यामुळे त्यांचा मतदारांवर प्रभाव होता. त्यामुळे त्यांनी आपल्या अचूक रणनीतीच्या जोरावर भाजप उमेदवार रवी राजा यांना अस्मान दाखवले.

### निकालानंतर शिंदे समर्थकाच्या कारला आग, CCTVत थरार



पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या निवडणूक निकालानंतर राजकीय वातावरण तापलेले असतानाच थेरगाव परिसरात एक धक्कादायक घटना घडली आहे. निकाल जाहीर झाल्यानंतर मध्यरात्री एका कारला जाणीवपूर्वक आग लावण्यात आल्याचा गंभीर प्रकार समोर आला असून, ही संपूर्ण घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. या घटनेमुळे पिंपरी-चिंचवडमध्ये राजकीय तणाव अधिकच वाढला आहे. विशेष म्हणजे, ही कार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या पराभूत उमेदवाराच्या नातेवाइकाची असल्याने, या घटनेला राजकीय वळण मिळाले आहे. आरोपी हा राजकीय पक्षाचा कार्यकर्ता असल्याचा थेट आरोप करण्यात आला असून, पोलिसांकडून मात्र अद्याप गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही. समोर आलेल्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये धक्कादायक तपशील स्पष्टपणे दिसून येतात. एका अज्ञात व्यक्तीने आधी एका बाटलीतून ज्वलनशील द्रव थेट उभ्या असलेल्या कारवर फेकल्याचे या दृश्यांमध्ये स्पष्ट होते. त्यानंतर त्या व्यक्तीने काडेपेटीचा वापर करून क्षणार्धात कारला आग लावली आणि घटनास्थळावरून पळ काढला. काही क्षणांतच संपूर्ण कारने पेट घेतल्याचे या व्हिडीओत दिसते. ही घटना इतकी नियोजित आणि थंड डोक्याने करण्यात आल्याचे चित्रण सीसीटीव्हीमधून समोर येत असून, त्यामुळे हा अपघात नसून जाणीवपूर्वक केलेला जाळपोळ प्रकार असल्याचा संशय अधिक बळावला आहे.ही कार आकाश बारणे यांच्या मालकीची असल्याची माहिती समोर आली आहे. आकाश बारणे हे शिंदे शिवसेनेच्या पराभूत उमेदवाराचे चुलत भाऊ असून, प्रभाग क्रमांक 23 म्हणजेच थेरगाव परिसरात ही घटना घडली.